www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ४७ रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर' यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

मुंबई : शीख पंथाचे ९ वे गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य हे केवळ शीख पंथीयांसाठी नव्हे, तर संपूर्ण भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गुरु तेग बहादुर यांच्या हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर पोहोचविण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर' यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त दादर येथील योगी सभागृहात राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार बाबू सिंह महाराज, अल्पसंख्याक विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, संत ज्ञानी हरनाम सिंघजी (खालसा भिंदरनवाले मुखी दमदमी टकसाल, प्रधान सत समाज), राज्यस्तरीय समितीचे रामेश्वर नाईक, सरताज सतींदर, महंत सुनील महाराज, स्वामी हिरानंद, प्रसिद्ध गायक सतेंदर



सरताज आदींसह विविध सहा समाजाचे संत, गुरू आणि समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुरु तेग बहादुर यांनी भारतातील सर्व धर्मीयांच्या रक्षणासाठी बलिदान दिले आहे. म्हणूनच त्यांना 'खालसा दी चादर'



नव्हे तर 'हिंद दी चादर' म्हटले गेले. त्यांनी धर्मांतरास विरोध करत भारताच्या संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नांदेड, नागपूरसह मुंबईत शहिदी समागमनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, गुरूबाणी ही जगातील एक अशी अनोखी रचना आहे ज्यात केवळ शीख गुरूंचेच नव्हे तर संत नामदेवांचे आणि विविध पंथांचे चांगले विचार समाविष्ट आहेत. सर्व चांगल्या विचारांना सोबत घेऊन जीवनाचा मार्ग दाखवणारी ही गुरूबाणी आपल्याला जोडण्याचे काम करते. या कार्यक्रमानिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले आहेत. हा कार्यक्रम जनमाणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करेल.


यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# गुजरातमध्ये राजकोटसह अनेक जिल्ह्यांना भूकंपाचे धक्के

**दैनिक युवक आधार**

गुजरातमधील राजकोट आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी दुपारी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू सौराष्ट्रातील गोंडलपासून २४ किमी पश्चिम नैर्ऋत्येस होता. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या वृत्तानुसार भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.४ इतकी नोंदवली गेली. राजकोट आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले.

अनेकांनी त्यांच्या घरात भूकंपाचे धक्के जाणवल्याची माहिती दिली. भूकंपाच्या या धक्क्यामुळे जनतेत घबराट पसरली होती. सुदैवाने जीवितहानी किंवा मालमत्तेच्या नुकसानीचे कोणतेही वृत्त नाही. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सतर्क झाली आहेत. गुजरात सरकारने लोकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही असामान्य परिस्थितीची



त्वरित स्थानिक प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे.


**व्हिडीओ व्हायरल**

राजकोट शहर, गोंडल, जसदान, धोराजी आणि आसपासच्या ग्रामीण भागात भूकंपाचे धक्के स्पष्टपणे जाणवले. लोक त्यांच्या घरांमधून, कार्यालयांमधून आणि आस्थापनांमधून बाहेर धावत सुटले. लोकांनी सोशल मीडियावर खुर्च्या आणि पंखे थरथरताना दाखवणारे अनेक व्हिडीओ शेअर केले आहेत.

# पुणे पदवीधर निवडणुकीसाठी इच्छुकांची भाऊगर्दी; भाजपने कसली कंबर; मविआत इच्छुकांची मोर्चेबांधणी

**दैनिक युवक आधार**

पुणे पदवीधर निवडणुकीसाठी आतापासूनच इच्छुकांची भाऊगर्दी पाहायला मिळत आहे. मागील निवडणुकीत महाविकास आघाडीकडून झालेला पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागल्याने ही उणीव भरून काढण्यासाठी यंदा पक्षाने चांगलीच कंबर कसली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी भाजपात प्रवेश केल्याने समीकरणे बदलली असून, भाजपमधील इच्छुकांना चाप



बसला आहे. मात्र, महाविकास आघाडीकडे उमेदवारीसाठी इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

मागील निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतून अरुण लाड यांना उमेदवारी मिळाली. त्यांच्या विरोधात भाजपचे संग्रामसिंह देशमुख, मनसेच्या रुपाली पाटील, जनता दलाचे शरद पाटील, अपक्ष डॉ. श्रीमंत कोकाटे, बहुजन आघाडीचे सोमनाथ साळुंखे असे उमेदवार होते. मात्र, खरी लढत महाविकास आघाडी व भाजपमध्ये झाली. एकूण झालेल्या मतांपैकी २ लाख २८ हजार २५९ मते वैध ठरली, तर तब्बल १९ हजार ४२८ मते अवैध ठरली. विजयासाठी १ लाख १४ हजार १३१ कोटा निश्चित करण्यात आला होता. महाविकास आघाडीचे उमेदवार अरुण लाड यांनी पहिल्याच फेरीत १ लाख २२ हजारांहून अधिक मते घेत एकहाती विजय मिळवला होता. त्यांचे विरोधक भाजपचे उमेदवार संग्रामसिंह देशमुख यांना केवळ ७३ हजार एवढी मते मिळाली. लाड यांचा ४८ हजार ८२४ मतांनी विजय झाला.

पुणे पदवीधर मतदारसंघात पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे येतात. भाजपकडून शरद लाड हे इच्छुक आहेत. तर दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे आणि जनसुराज्य पक्षातर्फे अनेक जण इच्छुक आहेत. नव्याने मतदार नोंदणीचा धडाका सुरू झाला आहे. प्रत्येक पक्षाचे गटनेते पदवीधरांची मत नोंदणी अधिक कशी होईल, याकडे लक्ष देत आहेत. आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लक्षात घेऊन भाजपात प्रवेश केला आहे. आता त्यांना भाजपमधून उमेदवारी मिळते का ?, याबद्दल औत्सुक्य आहे.

# पनवेलकर वैष्णवी कडू हिने कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण करत घेतली उंच भरारी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल शहरातील उत्तर रायगड जिल्हा भाजपा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी गणेश कडू हिने कमर्शियल पायलट प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करत संपूर्ण रायगड जिल्ह्याचा अभिमान वाढवला आहे. बालपणापासूनच विमान चालवण्याचं स्वप्न मनात बाळगलेल्या वैष्णवीने चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केलं आहे. वैष्णवीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिच्या कुटुंबासह संपूर्ण पनवेल परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असून, ती अनेक तरुणींसाठी



प्रेरणादायी ठरत आहे."वैष्णवीच्या यशामुळे रायगड जिल्ह्यातील प्रत्येक मुलीला मोठी स्वप्ने पाहण्याचं आणि ती पूर्ण करण्याचं बळ मिळालं आहे," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनीही वैष्णवीच्या यशाचं कौतुक करत तिचं अभिनंदन केलं. "वैष्णवी गणेश कडू हिने कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण करून तिच्या स्वप्नांना उंच भरारी दिली आहे. तिच्या या यशामुळे केवळ कडू कुटुंब नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचा अभिमान वाढला आहे," असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.उत्तर रायगड जिल्हा भाजपा उपाध्यक्ष गणेश कडू यांच्या कन्येच्या या यशाबद्दल आमदार ठाकूर यांनी हार्दिक अभिनंदन व्यक्त करत वैष्णवीला तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आता वैष्णवी आंतरराष्ट्रीय विमानसेवा क्षेत्रात करिअर घडवण्याचा मानस बाळगते आहे. तिच्या या यशामुळे पनवेल व रायगड जिल्ह्यातील अनेक तरुणींच्या मनात उंच भरारी घेण्याचं नवं स्वप्न साकार झालं आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'संगीत मॅरेथॉन'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'उत्कर्ष संगीत मैफिल' तर्फे मराठी आणि हिंदी सुमधूर ७५ गाण्यांचा बहारदार कार्यक्रम अर्थात संगीत मॅरेथॉनचे शनिवार दिनांक ०१ नोव्हेंबर रोजी पनवेलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे हा संगीत कार्यक्रम सकाळी ११.३० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग होणार आहे. या



कार्यक्रमात गायक गोपाळ पाटील स्वतः ७५ गाण्यांची मनमोहक सादरीकरणे करणार असून, या कार्यक्रमात उरण, पनवेल आणि नवी मुंबई येथील ७५ गायकांचा गायक म्हणून सहभाग लाभणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेली पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली आहे आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबीर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा अशी विविध समाजोपयोगी उपक्रमे संपन्न झाली असून पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमे होणार आहेत. त्याच अनुषंगाने उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत ७५ गाण्यांची संगीत मॅरेथॉन होणार असून रसिक प्रेक्षकांनी या अनोख्या गायन पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गायक गोपाळ पाटील आणि सहकारी गायकांनी केले आहे.




# पनवेल युवा दिपावली अंक उत्कृष्ट आणि वाचनीय - लोकनेते रामशेठ ठाकूर

## पनवेल युवा दिपावली अंकाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

निलेश सोनावणे संपादित पनवेल युवा दिपावली अंकाचे प्रकाशन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पार पडले .पनवेल युवा चा दिपावली विशेष अंक दर्जेदार, उत्कृष्ट, वाचनीय असल्याचे सांगून सर्व स्तरातील वाचकांनी हा अंक जरूर वाचावा असे देखील आवाहन



केले .यावेळी पनवेल युवा चे संपादक निलेश सोनावणे यांनी प्रास्ताविक केले गेली सतरा वर्षे पनवेल युवा दिवाळी अंकाची परंपरा सुरु असून १८ व्या दिवाळी अंकाचे प्रकाशन देखील लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्तेच होत आहे .या वर्षीचा अंक अतिशय वाचनीय असून वाचकांनी तो जरूर वाचावा असेही निलेश सोनावणे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले .या अंकाच्या प्रकाशन वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस शिवदास कांबळे ,पनवेल महानगर पालिका रिपाई जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे रायगड जिल्हा कार्यध्यक्ष अमोल इंगोले ,माजी नगराध्यक्ष संदीप पाटील ,भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष माजी नगरसेवक गणेश कडू, रिपाई पनवेल शहर कार्याध्यक्ष मोहन गायकवाड , पत्रकार संजय कदम ,संतोष आमले ,रवींद्र गायकवाड ,लालचंद यादव ,शंकर वायदंडे ,अण्णा आहेर ,राजेंद्र कांबळे,सुनील वारगडा, दीपक महाडिक ,केवल महाडिक, शैलेश चव्हाण आदी जण उपस्थित होते .

# डोंगरखरर्डा पंचायत समिती मतदारसंघातून मनोज जुमनाके इच्छुक

## कर्तुत्वान युवा तरुण च्या एन्ट्रीने राजकीय चर्चेला उधाण

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



**कळंब:** तालुक्यातील डोंगरखरर्डा पंचायत समिती मतदारसंघातून मनोज जुमनाके इच्छुक मतदार संघातून सदस्य पदासाठी महाविकास आघाडीने उमेदवारी दिल्यास इच्छुक आहेत,पंचायत समिती पदासाठी मतदार संघ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहेत आरक्षण जाहीर झाले आहे त्यामुळे मनोज जुमनाके यांचे नाव चर्चेत आहे उमेदवारी मिळाल्यास आपण निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे मनोज जुमनाके यांनी सांगितले.कोणताही राजकीय वारसा नसलेलं एक कणखर युवा नेतृत्व,सामाजिक कार्य,युवकांमध्ये असलेली ओळख,कणखर युवा नेतृत्व,समाजाप्रति असलेली जान, जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी असलेली तळमळ,यामुळे मनोज जुमनाके यांचे नाव डोंगरखर्डा - पंचायत समिती गण पदाच्या शर्यतीत आघाडीवर आहे.त्यांचे सामाजिक कार्यक्रम धार्मिक कार्यक्रम परिस्थिती नसताना पुढे पाऊल टाकत राम नवमी असो या दुर्गा उत्सव असो शासकीय कार्यक्रम असो गरीब व गरीब महिलांना साडी चोळीचे वाटप नृत्य स्पर्धा व आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे जंतन व्हावे यासाठी ढेमसा स्पर्धेचे सुद्धा आयोजन करत आहे मणिपूर मधील आदिवासी महिलावर अन्याय अत्याचार व महागाई विरोधात व अनेकदा रस्त्यावर उतरून जुलमी सरकारच्या विरोधात आंदोलन करून सरकारला धारेवर धरले आहे, मनोज जुमनाके ह्या डोंगरखर्डा येथील सामाजिक कार्यकर्ते आहे जुमनाके हे अनेक वर्षापासून गोरगरीब आदिवासी जनतेच्या सेवेसाठी तत्पर आहे महाविकास आघाडीतून उमेदवारी मिळाल्यास आपण निश्चित ही निवडणूक लढणार त्यासाठी महाविकास आघाडीतील उबाठा शिवसेना पक्ष राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष प्रहार जनशक्ती पक्ष,मनसे या सर्व पक्षांनी आपणास सहकार्य करावे असे आव्हान त्यांनी केले आहे.

# आरक्षणानं संधी मिळाली, आता महिलांना जबाबदारीही मिळेल का?

**दैनिक युवक आधार**
**लातूर/ मोहम्मद पिंजारी**




मुरूड सर्कलचं नवं आरक्षण जाहीर झाल्यानंतर इथल्या राजकीय वातावरणात एकदम खळबळ उडालीये. यंदा जिल्हा परिषदेसाठी ओबीसी (महिला) प्रवर्ग, तर पंचायत समितीसाठी एससी (पुरुष) आणि ओबीसी (महिला) अशा जागा ठरल्यात. या आरक्षणानं राजकारणात महिलांना संधी मिळणार असली, तरी त्या खरंच स्वतंत्र नेतृत्व देऊ शकतील का, हा प्रश्न चर्चेत आलाय

अनेक वर्षांपासून मुरूड भागात काही ठराविक गटांचं नेतृत्व ठाण मांडून बसलेलं आहे. बदलाची हवा वाहतेय असं दिसत असलं, तरी प्रत्यक्षात जुन्याच गटांचे लोक नवे मुखवटे लावून मैदानात उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, गावोगावच्या शिक्षिका, समाजसेविका आणि स्वयंसहायता गटातील महिला आता उत्साहात दिसतायत. "आमचं नेतृत्व आम्हीच घडवू," असं म्हणत त्या राजकारणात पाऊल ठेवतायत

महिलांना आरक्षण मिळालं तरी निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज ऐकू यायला हवा, अशी जनतेची मागणी आहे. कारण पूर्वी अनेकदा महिला उभ्या राहिल्या, पण प्रचारापासून निर्णयापर्यंत सगळं नियंत्रण पुरुषांकडेच राहिलं. त्यामुळे यंदा खरंच महिला स्वतः निर्णय घेणार का, की पुन्हा "पत्नीच्या नावावर पती" असाच प्रकार घडणार, अशी शंका ग्रामस्थ व्यक्त करतायत. युवक वर्गात मात्र एक वेगळा जोश आहे. सोशल मीडियावर आणि गावपातळीवरील बैठकींमध्ये 'बदल' हा शब्द जोरात ऐकू येतोय. शिक्षित आणि समाजाभिमुख महिलांनी पुढं आल्यास राजकारणाचा चेहरामोहराच बदलू शकतो, असा विश्वास नागरिक व्यक्त करतायत. काही तरुण तर स्पष्ट सांगतात — "आरक्षण हे फक्त जागेसाठी नको, अधिकारासाठी हवं."मुरूड परिसरात ओबीसी लोकसंख्या मोठी असून, त्यांचं प्रभावी नेतृत्व गेली अनेक वर्षं दिसलं नाही. त्यामुळे या वेळी जिल्हा परिषदेची निवडणूक ओबीसी समाजासाठी अभिमानाचा आणि आत्मभान जागवणारा क्षण ठरू शकतो. महिला नेतृत्व उभं राहिलं, तर केवळ राजकारणात नाही, तर समाजातही एक नव्या विचारांची दिशा निर्माण होईल

निवडणुकीत प्रस्थापित नेत्यांपेक्षा तळागाळातून उभं राहिलेलं महिला नेतृत्व अधिक प्रभावी ठरेल, अशी आशा व्यक्त केली जातेय. लोकशाहीच्या खऱ्या अर्थानं नेतृत्वाचं शाळा असणाऱ्या या संस्था जिल्हा परिषद व पंचायत समिती — जर खऱ्या अर्थानं महिलांच्या हातात गेल्या, तर विकासाला नवं रूप मिळू शकेल. मुरूड सर्कल आता एका नव्या वळणावर उभं आहे एका बाजूला जुने चेहरे, तर दुसऱ्या बाजूला नव्या पिढीचा आत्मविश्वास.आता सगळ्यांच्या नजरा एकाच दिशेला ही वेळ खरंच बदल घडवेल का?

# सातव्यात "आनंदाचं देणं" उपक्रमातून गरीब कुटुंबांना फराळ किटचे वाटप



**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):**

प्रतीवर्षीप्रमाणे यंदाही श्री आळोबानाथ चॅरिटेबल ट्रस्ट, सातवे यांच्या वतीने शिवम प्रतिष्ठान, घारेवाडी (कराड) यांच्या सहकार्याने आणि मा. इंद्रजित देशमुख साहेब यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली "आनंदाचं देणं" हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत सातवे आणि परिसरातील गरजू व ऊसतोड मजूर कुटुंबांना दिवाळी फराळ किट वाटप करण्यात आले. तसेच मा. पंडितराव चौगुले (आपा) यांनी दिलेल्या ₹1000 देणगीच्या माध्यमातून इंदुश्री बाजार, सातवे यांच्या सहकार्याने ५५ कुटुंबांना आंघोळीचे साबण वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमात डॉ. संतोष निकम श्री संजय मोरे (मेजर), पोपट सुतार, सतीश डुबल (गुरुजी), शुभम भाकरे आदी ट्रस्ट विश्वस्त व स्वयंसेवक कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेत विशेष परिश्रम घेतले.

माणुसकीची दिवाळी — आळोबानाथ चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम समाजात आदर्श ठरला या उपक्रमातून समाजात माणुसकीचे मूल्य जपत आनंद वाटण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

# प्रसाद खारकर यांची परभणी जिल्हा भाजपा सरचिटणीस पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी)शिवाजी पवार**

भारतीय जनता पक्षाचे सक्रिय व तरुण कार्यकर्ते प्रसाद माधवराव खारकर यांची नुकतीच परभणी जिल्हा भारतीय जनता पक्ष सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे. पक्ष संघटन बळकटीसाठी आणि केंद्र तसेच राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ही निवड करण्यात आल्याचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रात नमूद आहे.

नियुक्तीपत्र प्रदान समारंभात पालकमंत्री मेघना बोर्डीकर आणि माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते प्रसाद खारकर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, तालुका अध्यक्ष गणेश काटकर, तालुका उपाध्यक्ष काका आवटे, कामगार





मोर्चा अध्यक्ष अशोक ताठे, एड. कृष्णा शेरे, विक्रांत पाटील तसेच भारतीय जनता पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

खारकर यांच्या या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे. मागील नगरपरिषद निवडणुकीत ते भाजपकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार होते. त्यामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही नियुक्ती राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे.

# सेलू तालुका शिवसेना प्रमुखपदी संदीप हरीभाऊ लहाने यांची निवड

**शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी जबाबदारी स्वीकारली**



**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर वाढलेल्या आणि मागील चार दशकांपासून सामाजिक, राजकीय व लोकपयोगी कार्यात सक्रिय असलेल्या संदीप हरीभाऊ लहाने यांची शिवसेना पक्षाच्या सेलू तालुका प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. आनंद भरोसे यांनी या नियुक्तीचे पत्र संदीप लहाने यांना आज (दि. २५) सुपूर्द केले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीनंतर संदीप लहाने यांनी सांगितले की, "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा पाया माझ्या आयुष्यात जन्मत:च रुजला आहे. वडील माजी आमदार हरिभाऊ लहाने यांच्या मार्गदर्शनामुळे समाजकारणाची दिशा मिळाली. आता सेलू तालुक्यातील जनतेच्या अडचणी सोडविणे व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी मी कटिबद्ध राहील."

लहाने यांच्या नियुक्तीमुळे शिवसेनेच्या तालुका पातळीवरील संघटनात्मक कार्याला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास पक्षातील पदाधिकारी व शिवसैनिकांनी व्यक्त केला आहे.

# काकळ गौळवाडीचा ग्रामपंचायत सदस्यांसह भाजप मध्ये जाहिर पक्षप्रवेश

## तळाशेत जिल्हा परिषद मतदार संघात भाजपाचे जोरदार वारे

**दैनिक युवक आधार**
**बोरघर / माणगाव**

भारतीय जनता पक्षाचे युवानेते निलेश थोरे यांच्या नेतृत्वामध्ये भाजप ने तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघा मध्ये जोरदार बांधणी केली असून दिनांक २४ ऑक्टोबर रोजी साई पंचायत समिती गणातील काकळ गौळवाडी या संपूर्ण गावाने गावकमिटीचे अध्यक्ष व साई विभागातील जेष्ठ कार्यकर्ते किसन महाडिक यांच्या नेतृत्वामध्ये भाजपा दक्षिण रायगड कार्यालय अलिबाग येथे जाहीर पक्षप्रवेश केला, विशेष म्हणजे सर्वांनी एकमुखी निर्णय घेऊन सर्वच्या सर्व ग्रामस्थांनी पूर्ण गावाचा पक्षप्रवेश केला ला.

काकळ गौळवाडीसह भारतीय जनता पक्षामध्ये रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ऍड.आस्वादशेठ पाटील,जिल्हा सरचिटणीस ऍड.महेश मोहिते,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ.चित्राताई पाटील,युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे,माणगाव तालुकाध्यक्ष परेश सांगले,महिला तालुकाध्यक्षा सौ.रचना थोरे,तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर,संतोष कळंबे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये पक्षप्रवेश केला.

यावेळी गांव कमिटी अध्यक्ष किसन महाडिक यांच्यासमवेत विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्री. गजानन रिकामे,मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष नामदेव बाटे,गावकमिटीचे सचिव सुनील महाडिक,खजिनदार दगडू महाडिक,मुंबईकर मंडळाचे उपाध्यक्ष मुकेश रिकामे,सेक्रेटरी अशोक जाळगावकर,उपसेक्रेटरी विलास महाडिक,खजिनदार विनायक महाडिक,उपखजिनदार संदीप महाडिक यांच्यासमवेत अनंत महाडिक,सौरभ महाडिक,निखिल महाडिक,सुरेश नटे,निखिल रिकामे,संतोष महाडिक,आकाश महाडिक,वसंत महाडिक,अमोल बाटे,अनिकेत बाटे,अशोक रिकामे,तुषार बाटे,रिद्धेश महाडिक,अनिल महाडिक,अरविंद महाडिक,हृषभ महाडिक,रामजी महाडिक,अक्षय महाडिक,हृतिक महाडिक,अल्पेश महाडिक,केतन महाडिक,निखिल महाडिक,वसंत महाडिक,दिलीप महाडिक,भारत




महाडिक,अंकुश रिकामे,गणपत महाडिक,सचिन महाडिक,ओमकार महाडिक यांनी जाहीर पक्षप्रवेश केला.

यावेळी ऍड.महेश मोहिते यांनी उपास्थिताना मार्गदर्शन केले,यावेळी किसन महाडिक यांनी सांगितले कि युवानेते निलेश थोरे यांच्यासारखा रात्री अपरात्री सामान्य माणसांना स्थानिक पातळीवर धावून जाणारा व प्रशासनाची जाण असणारा कार्यकर्ता आपल्या भागामध्ये त्यांच्या पत्नी सौ.रचना थोरे यांना येत्या निवडणुकीच्या रिंगणात उतरवत असल्याने त्यांचे हात बळकट करण्यासाठी व केंद्राच्या,राज्याच्या योजना आणि विकास आमच्या गावातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्या साठी आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहोत.यावेळी निलेश थोरे यांनी काकळ गौळवाडी ही केवळ पक्षात आली नसून तर भाजपा परिवारात सामील झाली आहे त्यामुळे भविष्यात येथील ग्रामस्थांच्या मनात असणारी विकासकामे तर होतीलच परंतु केवळ विकासकामांवर न थांबता येणाऱ्या प्रत्येक अडचणी संकटात भाजपा ताकदिनीशी ग्रामस्थांच्या पाठीशी उभी असणार आहे.दरम्यान या पक्षप्रवेशामुळे या विभागात व मतदारसंघात भाजपाला आणखी ताकद मिळाली असून मतदार संघात भाजपाचे वारे जोरदार वाहत असल्याचे स्पष्ट होत आहे. या कार्यक्रमासाठी अलिबाग तालुकाध्यक्ष रोशन भगत, अशोक वारगे,चेतन पाटील यांच्या समवेत महादेव कदम,नयन पोटले,साईनाथ पेणकर,अमोल पवार,सरचिटणीस बाबुराव चव्हाण,अनिल दांडेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

# राज्यातील मित्रपक्षांना संपवण्याचा भाजपाचा डाव, एकनाथ शिंदेंची दिल्लीवारी पक्ष वाचवण्यासाठी: हर्षवर्धन सपकाळ

## भाजपाच्या संगतीत अजित पवारांना वाण नाही पण गुण लागला, भाजपाची खोटं बोल पण रेटून बोल, शैली उचलली

## फलटणच्या महिला डॉक्टरचे आत्महत्या प्रकरण दडपण्याचा प्रयत्न, २४ तासानंतरही गृहमंत्री गप्पच, फडणवीस असंवेदनशिल व अकार्यक्षम गृहमंत्री

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

भारतीय जनता पक्ष ही चेटकीण असून दुसऱ्यांचे पक्ष खाण्याचा रोग या पक्षाला जडला आहे. आधी त्यांनी विरोधी पक्ष खाल्ले आता मित्रपक्षांना खायला निघाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मित्रपक्षांना स्वबळावर लढायला लावून भाजपा शिंदेसेना व अजित पवारांच्या पक्षाचा काटा काढणार हे लक्षात आल्यानेच माझा पक्ष व मला वाचवा, अशी मनधरणी करण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले आहेत, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सत्तेतील गँग ऑफ ट्रिपल इंजिन सरकारमध्ये सर्व काही आलबेल आहे असे नाही. भाजपा, शिंदेसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच प्रचंड वाद आहेत, तिन्ही पक्षात कुरघोडीचे राजकारण सुरु असल्याने हे सरकार पाच वर्ष कसे चालणार हा कुतुहलाचा प्रश्न आहे. आता शिंदेसेनेलाच गिळंकृत करण्याचा डाव भाजपाने आखला असून स्वतःला वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले आहेत,पण भाजपाचा मित्रपक्षांबद्दलचा आतापर्यंतचा अनुभव पाहता ते शिंदेना कितपत दाद देतील हे पहावे लागेल, असे सपकाळ म्हणाले.

फलटणमधील महिला डॉक्टरचे आत्महत्या प्रकरण उघड होऊन २४ तास झाले तरी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर चकार शब्दही काढला नाही. असा असंवेदनशील व अकार्यक्षम गृहमंत्री महाराष्ट्राला याआधी कधी लाभला नाही, हे प्रकरण दडपण्याचाच प्रयत्न सुरु असल्याचे दिसते. महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर जे आरोप होत आहेत ते अत्यंत गंभीर आहेत. त्या महिला डॉक्टरने तक्रार करुनही त्याची दखल घेतली नाही, पोस्टमार्टम रिपोर्ट बदलण्यासाठी दबाव आणला जात आहे. सुसाईड नोटही गायब करतील म्हणून त्या महिला डॉक्टरने हातावर नोट लिहिली होती असेही सपकाळ म्हणाले..

संजय गायकवाड यांनी केलेल्या आरोपावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सरकार त्यांच्याच पक्षाचे आहे, मातृभूमी फाऊंडेशनची उच्चस्तरीय चौकशी करा किंवा एसआयटी बसवा आणि त्यात काही तथ्य असेल तर कठोर शिक्षा करा पण ते कांगावा करत असतील तर सार्वजनिक जिवनातून निवृत्त व्हावे असे आव्हान सपकाळ यांनी दिले आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे जाहीर आश्वासन अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दिलेले आहे. मध्यंतरी अजित पवार यांनी आम्ही असे म्हटले नव्हते असे म्हणाताच त्यांचा जाहिरनामाच त्यांना दाखवला होता तरिही ते पुन्हा कांगावा करत आहेत. खोटं बोल पण रेटून बोल, ही भाजपाची शैली अजित पवारांनी उचलली असून 'वाण नाही पण गुण तरी लागला', असेच म्हणावे लागले असा टोला सपकाळ यांनी लगावला.

# हॉंगकॉंग येथे झालेल्या आशियाई बेंचप्रेस स्पर्धेत भारताला गौरव - सोहम कारेकरचे सुवर्ण यश

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :**श्री साई सिद्धी सेवा संस्था आणि टू पॉवर जिम यांच्यावतीने सोहम कारेकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

सोहम कारेकर यांनी नुकत्याच हॉंगकॉंग येथे पार पडलेल्या आशियाई बेंचप्रेस चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक जिंकून भारताचा आणि महाराष्ट्राचा मान उंचावला आहे.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशियातील अनेक देशांतील नामांकित खेळाडूंनी




सहभाग घेतला होता. कठोर सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर सोहम यांनी प्रबळ प्रतिस्पर्ध्यांवर मात करून आपल्या वजन गटात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे देशभरातील पॉवरलिफ्टिंग क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

सोहम कारेकर यांना या प्रवासात टू पॉवर जिमचे संकेत चव्हाण प्रशिक्षक आणि मार्गदर्शक यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

त्यांच्यामागे सतत उभे राहून प्रेरणा देणाऱ्या श्री साई सिद्धी सेवा संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून गौरव व्यक्त केला.

संस्थेचे पदाधिकारी म्हणाले की, "सोहम कारेकर हा तरुण आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे. त्याच्या सातत्य, संयम आणि परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले आहे."


भारतीय संघातर्फे स्पर्धेत सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर रौप्य पदक पटकावणारा सोहम हा टू पॉवर जिमचा माजी विद्यार्थी असून त्याने महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात नवे मानक निर्माण केले आहे.

या विजयानंतर सोहम कारेकर याचे विविध ठिकाणी सत्कार करण्यात येत आहेत. श्री साई सिद्धी सेवा संस्था आणि टू पॉवर जिम यांच्या वतीने त्यांना पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## योगेश रामा भोरे यांची SBI बँक मध्ये क्लर्क पदी निवड गावकऱ्यांनी केला सत्कार



**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने**

भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील तरुण योगेश भोर, अतिशय बिकट परिस्थितीत शिक्षण घेऊन त्याची SBI बँक मध्ये क्लर्क पदी निवड झाली असता भातोडी गावचे सरपंच सौ भारती मधुकर गोफणे, उपसरपंच ,अनिता अंबादास उगले ,मा. उपसरपंच अरुण भोरे, ग्रामपंचायत सदस्य, रामदास चव्हाण ,रवींद्र उगले, मधुकर गोफणे सर,अरुण उगले, सोनाजी आवारे, बळी आवारे, उद्धव भोरे, कारभारी चव्हाण, बालाजी भोरे, दामोता उगले, सुरज उगले, मोहन पडोळ, युवराज अंभोरे, रामा भोरे, समाधान जगदाळे, शुभम भोरे, विशाल कदम, गणेश भोरे, अनिल भोरे ,गणेश भोरे, विठ्ठल भोरे, करण भोरे ,अविनाश भोरे ,परमेश्वर गोफणे, सुनील भोरे, युवराज भोरे, इत्यादी व समस्त गावकरी मंडळीने योगेश भोरे यांचा भव्य सत्कार करण्यात आला

# संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची आता नवी ओळख- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस प्रकल्पास मिहान मधील २२३ एकर जमिनीचे हस्तांतरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**

**नागपूर :**सोलर डिफेंस अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी नागपूर येथे विस्तार करीत आहे. या अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी अटी व शर्तीनुसार मिहानतर्फे २२३ एकर जागेचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

रामगिरी येथे आयोजित कार्यक्रमात मिहान प्रकल्पातील वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री यांच्या हस्ते सोलार कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. याप्रसंगी सोलार ग्रुपचे संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, सोलारचे वरिष्ठ अधिकारी जे.एफ साळवे,



महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपश्याम, संजय इंगळे आदी उपस्थित होते.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या या नव्या विस्तारित प्रकल्पामुळे नागपूरला देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून नवी ओळख प्राप्त होणार असल्याबद्धल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम महाराष्ट्राच्या 'मेक इन इंडिया' 'आत्मनिर्भर भारत' आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या गुंतवणूकदार-अनुकूल धोरणाबाबत अग्रगण्य उद्योगांचा वाढता विश्वास यावरून अधोरेखित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी भारतात सरंक्षण क्षेत्रात सुमारे १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक करत आहे. नागपूर येथे यातील ६८० कोटी रुपयांची गुंतवणूक करून हा प्रकल्प मिहान मधील विशेष आर्थिक क्षेत्रात साकारला जात आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती व सुमारे १ हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

या प्रकल्पामुळे संरक्षण उत्पादन उद्योग क्षेत्रात नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळणार असून विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीत मोठी भर पडणार आहे. महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असून विविध उद्योजकांना गुंतवणुकीसाठी आकर्षित करणे, प्रादेशिक रोजगारनिर्मिती वाढवणे, संरक्षण व इतर उत्पादन क्षेत्रात राज्याला अव्वल स्थानी नेणे हे मिहानचे ध्येय असल्याचे एमएडीसीचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

## महात्मा गांधी रोजगार हमीच्या मजुरांची जॉब कार्ड–केवायसी अनिवार्य!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम :** राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणारे अनेक योजनांची ई –केवायसी प्रक्रिया आता बंधनकारक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मागील 15 ते 20 वर्षापासून सुरू असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील मजुरांसाठी देखील ई –केवायसी करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. त्यामुळे या योजने अंतर्गत चालणाऱ्या काही अनियमित कामावर आता अंकुश येणार असल्याचे संकेत मिळत आहे.

2005 साली महात्मा गांधी रोजगार हमी कायदा लागू झाला. त्यानंतर राज्यभरातील प्रत्येक गाव सार्वजनिक आणि वयक्तिक लाभाच्या सुमारे 265 प्रकारच्या कामांना शासनाने मान्यता दिली. या कामासाठी गावागावात मजुराची नोंदणी करून त्यांना जॉब कार्ड देण्यात आले.या जॉब कार्ड वर विशिष्ट क्रमांक देण्यात आला असून आधारित अनेक विकास कामे जसे की घरकुल, सिंचन विहीर, तळे, जनावरांचे गोठे, मातोश्री पांदण रस्ते, गाव अंतर्गत रस्ते, स्मशान भूमीतील शेड व कंपाऊंड वॉल, जिल्हा परिषद शाळा समोरील कामे इ. राबविण्यात आली.




**आमच्या गावात सध्या रोजगार हमी योजने अंतर्गत जॉब कार्ड धारकांची ई–केवायसी प्रक्रिया सुरू आहे. येथील रोजगार सहाय्यक सक्रियपणे मजुरांची ई– केवायसी करत आहेत. काही मजुरांची प्रक्रिया पूर्ण झाली असून उर्वरित मजुरांनीही आपली ई –केवायसी विहित वेळेत पूर्ण करून प्रशासनाला सहकार्य करावे.**
**(सुनील गौतम खाडे. ग्राम विकास अधिकारी. गट ग्रामपंचायत सापळी.)**

अलीकडील काही वर्षात शासनाने या योजनेअंतर्गत पारदर्शकता निर्माण करण्या वर भर दिला आहे. आता प्रत्येक मजुराचे ई–केवायसी झाल्यानंतर त्याचे चेहरा प्रमानिकरन (चेहरा पडताळणी) करता येणार असून तो कामावर उपस्थित असल्याचा फोटो नोंदवला जाईल .

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या घरातून भेकराचे मांस जप्त — पोलिस आणि वनविभागाची संयुक्त कारवाई

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे तालुकाध्यक्ष जयेंद्र भगत हे वन्यजीव शिकार व मांस बाळगल्याच्या प्रकरणी अडचणीत सापडले आहेत. गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री त्यांच्या घरावर छापा टाकून सुमारे एक किलो भेकराचे मांस जप्त केले आहे. हे मांस संरक्षित श्रेणीतील भेकर या वन्यजीवाचे असल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाने व्यक्त केलाआहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे आणि सहायक पोलीस निरीक्षक एस. एन. मुसळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पंचासमवेत



घेण्यात आलेल्या छाप्यात, भगत यांच्या स्वयंपाकघरातील फ्रिजमधून मांस सापडले. त्यानंतर पंचनामा करून मांस ताब्यात घेतले असून ते पुढील तपासासाठी अलिबाग वन परिक्षेत्र कार्यालयाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.फणसाड अभयारण्यातून भेकराची शिकार करून हे मांस घरात आणल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस आणि वन विभागाने संयुक्त तपास सुरू केला आहे. शुक्रवारी संध्याकाळपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता, मात्र प्राथमिक चौकशीच्या नंतर पुढील कारवाई अपेक्षित असल्याचे समजते.या कारवाईनंतर रायगड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

जयेंद्र भगत हे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे विश्वासू सहकारी मानले जातात. विशेष म्हणजे, चारच दिवसांपूर्वी आदिती तटकरे यांच्या हस्ते "माझे वन" या वनविभागाच्या विशेष उपक्रमाची सुरुवात भगत यांच्या वाडगाव ग्रामपंचायतीत झाली होती.

त्यामुळे केवळ काही दिवसांतच त्यांच्या घरातून संरक्षित वन्यजीवाचे मांस सापडल्याने राजकीय स्तरावर आश्चर्य व्यक्त होत आहे.या घटनेला अनुसरून नागरिक आणि पर्यावरण प्रेमींमध्येही रोष आहे. वन्यजीवांचे संरक्षण हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून, शिकार अथवा मांस बाळगणे यांना कडक शिक्षा होऊ शकते.

या संदर्भात रायगड पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले की, "अशा प्रकारच्या अवैध शिकारीविषयी माहिती मिळाल्यास तातडीने जवळच्या पोलिस ठाण्यास किंवा वन विभागास कळवावी.

"या गंभीर घटनेवर अलिबागचे वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले --"वनविभागाकडून या प्रकरणाची सखोल चौकशी आम्ही सुरू केली आहे. चौकशीनंतर या प्रकरणात योग्य ती कारवाई केली जाईल.

"या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी राज्याचे वनसचिव मिलिंद म्हैसकर यांनी स्वतः हस्तक्षेप करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली आहे.

## पत्रकार अविनाश कदम यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने व विविध मान्यवरांनी केला शुभेच्छांचा वर्षाव

**सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांच्या सेवेसाठी कायम कार्यरत राहणार - अविनाश कदम**

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी शहरांसह तालुक्यात माझ्या संपर्कात आलेल्या प्रत्येकानेच आपल्यावर मनापासून प्रेम केले असून या प्रेमाची शिदोरी घेत आपण कार्यरत आहोत.यापुढेही समाजसेवा करीत आणि पत्रकार म्हणून सर्वांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास आष्टी युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै लोकमत,मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम



यांनी व्यक्त केला. दरम्यान मित्र परिवाराच्या वतीने व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कदम यांचा शाल,श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

पत्रकार अविनाश कदम यांचा वाढदिवस २१ ऑक्टोबर रोजी आष्टी शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.दिवसभर विविध ठिकाणी वाढदिवसानिमित्त अविनाश कदम यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी बोलतांना पत्रकार अविनाश कदम यांनी सांगितले की, आष्टी शहरांसह तालुक्यातील नागरिकांनी व मित्र परिवार,विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्यावर मनापासून प्रेम असून मी एक पत्रकार म्हणून सर्वांसाठी जे शक्य आहे ते आपल्या सामाजिक कार्याच्या व लेखनीच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे.आपले आशिर्वाद आणि सहकार्य माझ्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे असून यापुढेही आपल्या सेवेत अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास पत्रकार कदम यांनी व्यक्त केला.आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार सुरेश धस,माजी आ भिमराव धोंडे,माजी आ साहेबराव दरेकर,माजी आ बाळासाहेब आजबे,तहसीलदार वैशाली पाटील, शिवसेनेच्या नेत्या रेश्माताई जगताप, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सतिश शिंदे,पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, गटशिक्षणाधिकारी सीमा काळे यांच्यासह राजकीय व अधिकारी, सरपंच,उपसरपंच,शैक्षणिक, सामाजिक,संपादक,धार्मिक,पत्रकार आदी क्षेत्रांतील मान्यवरांनी व मित्र परिवार यांनी प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष, भ्रमणध्वनी,सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

## भाजपकडून संधी मिळाल्यास पिंपळगाव गणातून निवडणूक लढविणार : नवनाथ उत्तमराव निरगुडे

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

येणाऱ्या जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपा पक्षाने पिंपळगाव पंचायत समिती गणातून उमेदवारी दिल्यास मी ताकतीने निवडणूक लढवण्यास सज्ज असून मी सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लढत असल्याने जनतेच्या भेटत असलेल्या पाठिंब्यावर नक्कीच विजयी होऊ शकतो असे मत भाजपचे युवा नेते नवनाथ निरगुडे पाटील यांनी व्यक्त केले आहे . भाजपा आमदार श्यामभाऊ खोडे व भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे व ज्येष्ठ नेते नाथूजी कापसे तसेच मा. तालूकाध्यक्ष प्रल्हाद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप पक्षाने केलेल्या विकासकामांची माहिती तळागाळापर्यंत जनतेपर्यंत पोहोचवत युवा नेते नवनाथ निरगुडे पाटील यांनी जनतेशी सतत संपर्कात राहात गोरगरीब जनतेचे कामे केल्याने व सतत सर्वसामान्य जनतेशी नाळ ठेवल्याने त्यांच्या पिंपळगाव पंचायत समिती



गणात दांडगा संपर्क आहे. युवकांसोबत तसेच शेतकऱ्यांसोबत जवळीकता आणि अधिकाऱ्यांसोबत चांगले संबंध असल्याने शेतकरी, गोरगरीब जनतेचे कामे करून देण्यासाठी कायम तत्पर असल्याने सर्वसामान्य जनतेतून मी निवडणूक लढवावी म्हणून आग्रही आहेत.

याच बळावर मला भाजप पक्षाने पिंपळगाव पंचायत समिती गणातून उमेदवारी देऊन संधी दिल्यास नक्कीच विजयी होणार असल्याचे मत भाजपा युवा नेते नवनाथ निरगुडे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे .

# दांडगा जनसंपर्क असणारे मोसिन पठाण राजकीय मैदानात उतरणार

## जनतेची सेवा राजकारणात उतरून करण्याचा निर्धार

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

उमरखेड पंचायत समिती मध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत आहे आणि त्यात नव्याने तयार करण्यात आलेल्या कृष्णापूर गण सर्वसाधारण आरक्षण जाहीर होताच लोकांचे लक्ष याकडे लागले आहे

या गणामध्ये चुरमुरा पार्डी, आंबवन बाळदी, अमानपुर, हरदडा, कृष्णापुर,नागापूर रू आमगव्हाण,झाडगाव या गावचा समावेश करण्यात आला आहे, हा गण राजकीय पक्षांच्या नेत्यांना नवीन आहे पण नागापूर रू येथील दिवंगत नेते उपसरपंच नागापूर रू गावं निर्माते रहेमत खान मुनीर खान पठाण यांचे कार्य सर्व जनतेस परिचित आहे



त्यांचे चिरंजीव उच्च शिक्षित, मोसीन पठाण युवा सामाजिक कार्यकर्ते तहसिल कार्यालय येथे गोर गरीब जनतेची कामे करत आपली वेगळी ओळख निर्माण केली, मोसीन पठाण यांना राजकारण ची चुणूक आहे,त्याना नागापूर रू येथील जनता विकासासाठी एक आशावादी दुरदृष्टीने बघत आहे, प्रत्येक सामाजिक कार्यात त्यांचा हिरहिरीने सहभाग असतो, त्याना गणातील सर्व जनता परिचीत आहे ग्रामपंचायत चे सर्व सरपंच त्याना निवडणूक रिंगणात उतरवले तर निश्चितच त्यांचा विजय साकार होऊ शकतो, आज मोसीन पठाण यांचा गाढा संपर्क आहे, पैसा कमी पण आपल्या गोड वाणीने लोकांची मने जिंकली आहेत, वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन मोसीन पठाण नक्कीच समाजकारणात यशस्वी होतील का? अशी खमंग चर्चा ठिकठिकाणी रंगत आहे.

कृष्णापुर गण सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्यामुळे मोसिन पठाण यांची उमेदवारीचा दावा अधिक भक्कम दिसत आहे एक प्रभावी युवा चेहरा काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांक युवा मोसीन पठाण यांना उमेदवारी दिल्यास साहेबराव कांबळे यांचा युवा कार्यकर्ता म्हणून ते निश्चितच प्रभावी ठरतील अशी गणातून राजकीय पक्ष व कार्यकर्त्यात दिसुन येत आहे पार्टीने त्याना उमदेवार घोषित न केल्यास ते जर अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला तर निश्चितच ते राजकीय पक्षांच्या नेत्यांचा पराभव करण्यास कारणिभुत ठरू शकते पाहू या हा युवक कोणत्या पक्षाला उमदेवारी मागतो ते येणार काळ च सांगेल.

# डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी

## चौसाळा बसस्थानक येथे सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या बीड जिल्ह्याच्या भुमिकन्या डॉ.संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी दोषींवर कठोरात कठोर कारवाईची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनात शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२५ ऑक्टोंबर शनिवार रोजी चौसाळा बसस्थानक येथे सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या वेळी एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली. डॉ.संपदा मुंडे (रा. कोठारबन, ह.मु. कवडगाव,




ता. वडवणी, जि. बीड) यांनी फलटण येथे कार्यरत असताना पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने आणि घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर यांच्या शारीरिक व मानसिक छळामुळे आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या तळहातावर आत्महत्येचे कारण लिहिले होते, तसेच घरच्यांना "शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जातो" असे सांगितले होते. त्यांनी या संदर्भात उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली होती, मात्र वेळेत कारवाई न झाल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुंडे कुटुंबियांनीही "बीड जिल्ह्याची मुलगी असल्यामुळे तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले" असा गंभीर आरोप केला आहे. या वेळी आंदोलनकर्त्यांनी पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत. या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी., आत्महत्येस जबाबदार असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांवर व अन्य दोषींवर कठोर कारवाई करावी., तसेच शवविच्छेदन अहवालात हस्तक्षेप करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या वेळी रिपाई जिल्हा उपाध्यक्ष बापुराव पवार, माजी सभापती काकासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनवणे पांडुरंग, शिवसंग्राम नेते पांडुरंग आवारे, कल्याण महाराज जगताप, प्रदेशाध्यक्ष छत्रपती राजेशाहु महाराज विचार मंच विवेक कुचेकर, प्रा.आबासाहेब जाधव, बळीराम राऊत, मुस्तफा पठाण, आजिनाथ सोनावणे, सोहेल पठाण, प्रमोद नाईकवाडे, संतोष बोरखेडे, आत्माराम नाईकवाडे, उत्तम जाधव, लिंबाजी तांदळे, पत्रकार एन.टी.वाघमारे, विकास नाईकवाडे सह इतर जण उपस्थित होते. या वेळी सर्वांनी आंदोलनात सहभागी होऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली...

# "पंढरपूर-सातारा मुख्य मार्गावरील" साळमुख-पिलीव"रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त न केल्यास नविलाजास्तव जनआंदोलन करण्याचा अखेरचा इशारा"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**



**पंढरपूर-** सातारा या मार्गाला प्रति पालखी मार्ग असे संबोधले जाते. आणि त्याप्रमाणे आषाढी कार्तिकी व माघी वारीला सांगली, सातारा ,सोलापूर या जिल्ह्यातून व अनेक ठिकाणाहून पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी अनेक साधुसंतांच्या दिंड्या व पालखी सोहळे ये- जा करीत असतात. याशिवाय व्यापारी वर्ग त्यांचा असणारा आयात- निर्यातीचा माल, शेतकऱ्यांच्या शेतीचा माल उदाहरणार्थ मोठ्या प्रमाणात ऊसाची वाहतूक अशा अनेक उद्देशाने मोठ्या प्रमाणात रहदारी असते याशिवाय शालेय विद्यार्थ्यांच्या बसेस, मोठमोठ्या शहरांकडे जाणाऱ्या बसेस, याशिवाय दुचाकी स्वार, शिक्षणासाठी ये जा करीत असलेले विद्यार्थी विद्यार्थिनी, बाजारहाट करण्यासाठी जात-येत असलेले दुचाकीस्वार यांना या मार्गावरून प्रवास करीत असताना आपला जीव मुठीत धरून ये -जा करावी लागते. आणि हे काल-परवा आज असे नसून गेल्या चार वर्षापासून या रस्त्याची अशी अवस्था आहे खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा असा मोठा प्रमाणात जिकिरीचा प्रवास करावा लागत आहे. आठवड्यातून एक अपघात ठरलेलाच आहे, या अपूर्ण रस्त्यामुळे अनेकांचे जीव गेलेले आहेत वास्तविक याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना त्याचप्रमाणे मंत्रिमंडळ यांना सुद्धा ग्रामस्थांनी निवेदने दिलेली आहे. परंतु सदर रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून सर्वांच्याच विनंतीला केराची टोपली दाखवली गेलेली आहे. अनेक वर्तमानपत्राद्वारे सुद्धा याबाबत वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु झोपी गेलेल्या ठेकेदाराला काडीचा सुद्धा फरक पडला नाही. या रस्त्यावरुन प्रवास करताना दुचाकी स्वारालाच नव्हे, तर मोठ्या वाहनांना सुद्धा जीव मुठीत धरून मोठी कसरत करून प्रवास करावा लागत आहे. याविषयी असंख्य ग्रामस्थांच्या व वेगवेगळ्या संघटनांनी संताप व्यक्त केला असून आता जर याबाबत त्वरित लक्ष देऊन सदरचे खड्डे बुजून घेतले नाहीत किंवा रस्ता व्यवस्थित केला नाही, तर अखेरचे व अतिशय वेगळ्या पद्धतीने जनआंदोलन करण्याचा इशारा अनेक संघटना व ग्रामस्थांनी दिला असल्याचे समजते. त्यातून काही घडल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित ठेकेदार व संबंधित खाते जबाबदार राहील असाही इशारा देण्यात आल्याचे समजते.

# श्रीवर्धनात विकासाची नवी दिशा -भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याने प्रगतीला गती

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत आज विकासाचा नवा अध्याय सुरू झाला. शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५ रोजी विविध विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पणाचा भव्य सोहळा उत्साहात पार पडला. सकाळी ११ ते १२.३० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाला नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे शुभहस्ते मा. ना. कु. आदितीताई सुनील तटकरे (मा. मंत्री, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य) यांनी भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन केले.

कार्यक्रमाचे आयोजन श्री. विठ्ठल राठोड (प्रमुख मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगरपरिषद) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या सोहळ्यात नगरपरिषद हद्दीतील विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. त्यात —




- डॉ. के. वाय. राऊत चौक ते दादे नाका रस्ता डांबरीकरण
- खारवी समाज दांडा येथील अंतर्गत गटार बांधकाम
- श्री. बाळकृष्ण गोरनाक ते श्री. भगत सर घरापयत रस्ता कााक्रटाकरण
- कुंभारवाडा समाजमंदिर ते श्री. निलेश प्रभाळे घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण
- श्री. राममंदिर व धर्मशाळा परिसरातील पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम
- गायगोठण परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण
- धोंडगल्ली व जिवनेश्वर कोंड परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण
- जिवनेश्वर मंदिर ते कै. काशिनाथ बापू चोगले चौक रस्त्यालगत गटार बांधकाम

ही सर्व कामे श्रीवर्धन शहरातील मूलभूत सुविधा व नागरी सोयी-सुविधा सुधारण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

त्याचबरोबर मठाचा गवंड येथे उभारण्यात आलेल्या “ॲस्पिरेशनल टॉयलेट” या अत्याधुनिक सार्वजनिक शौचालयाचे लोकार्पण देखील करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानाशी सुसंगत असा हा उपक्रम शहरात स्वच्छता व आरोग्यदायी वातावरण राखण्यासाठी मोलाचा ठरणार आहे.

या प्रसंगी मान्यवरांनी नगरपरिषदेच्या विकासाभिमुख प्रयत्नांचे कौतुक करत सांगितले की, “श्रीवर्धन शहर आधुनिक, सुबक आणि नागरिकांना सर्व सुविधा उपलब्ध असलेले नगर बनविण्याचा हा प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहे.”

कार्यक्रमाच्या शेवटी नगरपरिषदेच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याने श्रीवर्धनच्या विकासाला नवा वेग मिळाला असून, शहराच्या प्रगतीची दिशा अधिक वेगवान आणि ठोस बनली आहे.सदर कार्यक्रमानंतर स्थानिक पक्ष नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये येणाऱ्या निवडणुकीसंदर्भात प्राथमिक चर्चा व इच्छुक उमेदवारांच्या पडताळणीचाही समावेश करण्यात आला. या सर्व उपक्रमांमुळे श्रीवर्धनच्या सर्वांगीण विकासाचा प्रवास आता अधिक गतिमान होणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

# पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने ॲड.महेश बेदरे आणि सुधीर एकबोटे यांचा गौरवपूर्ण सत्कार

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**



लोकनेते आमदार सुरेश(आण्णा)धस यांच्या पाटोदा तालुका प्रसिद्धीप्रमुख, मीडिया चीफ व पी.आर.ओ.पदी नुकतीच ॲड.महेश बेदरे यांची नियुक्ती झाल्या बद्दल व त्यांनी तसेच पत्रकार सुधीर एकबोटे यांनी विधी पदवी(L.L.B) यशस्वीरित्या संपादन केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दोघांचा भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश(आण्णा) धस यांचे स्वीय सहाय्यक श्री.सोमीनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ॲड.महेश बेदरे आणि पत्रकार सुधीर एकबोटे यांचा सत्कार शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. ॲड.बेदरे यांची नुकतीच १५ ऑगस्ट रोजी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पाटोदा तालुका प्रसिद्धीप्रमुख म्हणून नियुक्ती झाली होती. सामाजिक कार्यासह पत्रकारितेत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल आणि विधीक्षेत्रात नवा अध्याय सुरू केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास पाटोदा तालुका पत्रकार संघाचे ज्येष्ठ पत्रकार अरुण कुलकर्णी, अमीर शेख, बाळासाहेब लांडगे, विजय जाधव, सतीश गर्जे, दत्ता वाघमारे, शेख महेशर, सचिन गायकवाड, राहुल सोनवणे, सूर्यकांत पवळ, बाळासाहेब जायभाय, रमेश शहागडकर, सखाराम भोसले, अरशान अजीज शेख, रियाज सय्यद यांच्या सह आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार सोहळ्याच्या शेवटी ॲड.महेश बेदरे आणि सुधीर एकबोटे यांनी पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.सोमीनाथ कोल्हे तसेच सर्व सहकारी पत्रकार बांधवांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. कार्यक्रमात सौहार्द, आनंद आणि अभिमानाचे वातावरण अनुभवास आले.

# सावळघाट आशेवाडी राष्ट्रीय महामार्गावर पाच ठिकाणी अपघात काही जखमी तर काही उपचारादरम्यान दगावले

## टोल व्यवस्थापनास मनसेचे नामदेव गावित यांनी दिले निवेदन

**दैनिक युवक आधार- प्रतिनिधी कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**



राष्ट्रीय महामार्ग क्र. ८४८ वर सावळघाट ते आशेवाडी या मार्गावर वेगवेगळ्या पाच ठिकाणी गंभीर अपघात घडले आहेत. प्राथमिक माहिती नुसार, या अपघातांमध्ये काही 5 लोक जखमी होऊन दगावले ,आहेत, तर यातील काही जखमींवरती नजीकच्या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

या अपघातांची कारणे मुख्यतः अति वेगाने वाहन चालवणे आणि काहींनी मद्यपान करून वाहन चालवणे यांशी संबंधित आहेत.

याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना, दिंडोरी तालुका शाखेकडून चाचडगाव टोल व्यवस्थापनाला निवेदन देण्यात आले आहे.

**निवेदनात मुख्य मागण्या:**

1. राष्ट्रीय महामार्गावर स्पीड गण मशिन (स्पीड रडार सिस्टीम) लावून वाहतुकीवरील वेगावर नियंत्रण ठेवणे
2. वाहनचालक दारूच्या प्रभावाखाली वाहन चालवत आहेत का, याची नियमित तपासणी करणे.
3. अपघात टाळण्यासाठी घाट परिसरात वाहतूक नियंत्रण व चेतावणी फलक बसवणे.

तालुका अध्यक्ष नामदेव देवराम गावित यांनी सांगितले की, “सावळघाट–आशेवाडी मार्ग हा राष्ट्रीय महामार्ग असून, अपघातांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. तातडीने सुरक्षा उपाय, वेग नियंत्रण व मद्यतपासणी आवश्यक आहे.”

सदर निवेदन देताना दिंडोरी तालुका अध्यक्ष नामदेव गावित बाळु उदार (शाखा प्रमुख चाचडगाव), कैलास केदारे, साहेबराव शिंगाडे, तातीराम गवळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मनसेकडून प्रशासनास तातडीने कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला पळसखेड ल, पा योजना पूर्णत्वास नेल्याबद्दल जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर रिसोड प्रतिनिधी**




रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कायम सिंचनाच्या व विकासाच्या दृष्टीने असणारा अत्यंत महत्त्वाचा ल पाटबंधारे योजनेचा पळसखेड लपा प्रकल्प मागील १३ वर्षापासून बंद पडला होता हा प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळामार्फत सर्वसाधारण क्षेत्रातील असून पळसखेड गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात आलेला प्रकल्प आहे सदर योजना वाशिम जिल्ह्यातील गोदावरी खोऱ्यातील पैनगंगा उपखोऱ्यातील आहे वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील जवळपास ५/६ गावातील ३९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार होते व रिसोड तालुका हा सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत मागे असलेला तालुका असून मोठा कुठलाही प्रकल्प रिसोड मध्ये अस्तित्वात नाही शासनाने बारा वर्षांपूर्वी सदर प्रकल्पाला मंजुरी देऊन सदर निविदा प्रक्रिया सुद्धा पार पडली असून कडचा दराला सदरचे काम दिले होते परंतु सदर प्रकल्पामध्ये अनेक अडचणी होत्या सदर प्रकल्पामध्ये निधी अभावी सुद्धा प्रकल्प जवळपास बंद पडला होता २०१४मध्ये तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब मुख्यमंत्री असताना त्या मंत्रिमंडळामध्ये जलसंपदा मंत्री म्हणून गिरीश भाऊ महाजन यांची वर्णी लागली होती त्याच दरम्यान दिनांक सात सहा २०१६ रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन साहेब यांनी भाजपाचे तात्कालीन जिल्हा उपाध्यक्ष लखनसिंह ठाकुर यांच्या निवासस्थानी भेट देऊन शेतकऱ्यांसोबत संवाद साधला होता लखन सिंह ठाकुर यांच्या नेतृत्वात तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांनी पळसखेड लपा प्रकल्प मागील बारा तेरा वर्षापासून बंद असून सदर प्रकल्पाकरिता निधी सुद्धा उपलब्ध नसल्याबाबत मंत्री गिरीश भाऊ सोबत चर्चा केली व पळसखेड लपा योजना जर सुरू झाली तर तालुक्याला तालुक्यातील पाच-सात गावांना त्याचा लाभ काय होऊ शकते याबद्दलची माहिती दिली तसेच प्रकल्प नव्याने पुन्हा सुरू करून पूर्णत्वास न्यावे याबाबतची मागणी केली असता जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ महाजन यांनी रिसोड तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांना पळसखेड ल,पा ,योजना तात्काळ सुरू होऊन पूर्णत्वास जाईल निधीची कमी पडू देणार नाही याबाबत शब्द दिला होता तात्काळ मुख्य अभियंता व पाटबंधारे खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी रिसोड येथून संपर्क साधून सदर प्रकल्पाला तात्काळ गती देऊन सुरू करण्यात यावे याबाबत आदेशित केले त्यानुसार सदर प्रकल्प हा एका महिन्यात सुरू होऊन सध्या पूर्णत्वास आलेला आहे ज्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांना त्याचा सध्या लाभ मिळत आहे आपल्या राज्याचे कर्तव्यदक्ष सिंचन विकास पुरुष गिरीश भाऊ महाजन यांनी आपल्या रिसोड तालुक्यातील दिलेला शब्द पाळला या त्यांच्या स्तुत्य कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता तालुक्यातील पळसखेड प्रकल्पाच्या वतीने मंत्री गिरीश भाऊ महाजन यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला त्यांना प्रकल्प पूर्ण झाल्याचे छायाचित्र असलेली आकर्षक फोटो फ्रेम मुख्यमंत्री देवाभाऊ व जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ यांचे त्या फोटो फ्रेम मध्ये फोटो चित्रित करून शाल श्रीफळ आणि मिठाई देऊन गौरव करण्यात आला याप्रसंगी पळसखेड प्रकल्पाकरिता सातत्याने शासकीय पाठपुरावा करणारे भाजपाचे उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर भाजपाचे खुशाल पाटील ढोणे सुनील लाटे बंडूभाऊ डहाके नंदू भाऊ मगर सह भाजपाचे पदाधिकारी हजर होते त्यांच्या निवासस्थानी सत्कार स्वीकृत करताना जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ महाजन म्हणाले की रिसोड तालुक्यातील पळसखेड प्रकल्प मुळे रिसोड तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना सिंचनाच्या दृष्टीने खूप मोठा दिलासा मिळेल या प्रकल्पाशी निगडित अजूनही विकासात्मक कार्य करण्याचे प्रस्ताव असेल तर सादर करावा मी तात्काळ मंजूर करून निधी अभावी कोणतेही काम पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली

# प्रबोधनकार भीमशाहीर सदानंद मोरे यांना" कर्तव्यदक्ष आदर्श समाजसेवक पुरस्कार-2025 -लातूर येथे सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**



**अकोला -** महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य ) वतीने." मातृभूमीचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे ! गौरव कर्तव्याचा ,सत्कार

सेवकाचा !राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी सत्काराचा कार्यक्रम दिनांक 19/10/ 2025 ला भालचंद्र ब्लड बँक,मध्यवर्ती बस स्थानकाच्या मागे ,लातूर ,येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णाराव पाटील (विधिमंडळाचे अध्यक्ष )यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून _ लातूर जिल्ह्याचे लोकसभेचे खासदार _डॉक्टर शिवाजीराव काळगे , जेष्ठ पत्रकार - सुभाष घोडके, पत्रकार व्हाईस ऑफ मीडिया - राजेंद्र बारगुडे,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष-सुशील चिकटे , सिद्धार्थ कवठे कर , कार्यक्रमाचे मुख्य संयोजक - सुफी सय्यद संशोधन (संस्थापक सचिव) ,प्रबोधनकार भीमशाहीर प्रदीप कडबे , उषा धावरे , इत्यादी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . या कार्यक्रमात अकोला जिल्ह्यातील दापुरा येथील रहिवासी प्रबोधनकार भीमशाहीर सदानंद मोरे यांना सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , शाल ,मानाचा फेटा "कर्तव्यदक्ष आदर्श समाजसेवक पुरस्कार - 2025 सन्मानित करण्यात आले. यावेळी भीमशाहीर प्रदीप कडबे रामटेक (नागपूर) , आर .बी .ढगे ,सविता भारती, रंजना हसुरे ,उद्या भोसले ,बाळासाहेब मदाडे, डॉक्टर विकास निलंगेकर, डॉक्टर रामलिंग जावळे ,विशाल शिंदे ,डॉक्टर रामराव पवार ,डॉक्टर बळीराम पवार ,डॉक्टर शिवाजी गाडे, अजय पाटील ,एडवोकेट गणेश कांबळे ,दयानंद काळे, एडवोकेट लक्ष्मण शिंदे, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सुफी सय्यद शमशुदीन ,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - प्राध्यापक महादेव गपाट , यांनी केले , .

# जि.प. प्रशाला चिंचोली लिंबाजी येथे माझी विद्यार्थ्यांची तेवीस वर्षाने पुन्हा भरली शाळा

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर सतिश लोखंडे**

चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद शाळा २००२ मधील बॅचे विद्यार्थी तेवीस वर्षा पूर्वी एकत्र शिकत. असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा पुन्हा शाळा भरली . गेट टुगेदर कार्यक्रमा निमित्त स्नेह संमेलनात १९० विद्यार्थी / विद्यार्थिनी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला मा. मुख्याध्यापक लक्ष्मण गोंगे सर , गजेंद्र नरवडे , पांडुरंग घुले , बहिरू जावळेकर प्रकाश गाडेकर , रमेश धनेधर ,भागिनाथ ठाकरे नारायण भिंलगे , रमेश सोळुंके , राम सोनवणे , शैलेंद्र सोळुंके ,गणेश कथार ,भिमसिंग भिलेंगे , चौहान मॅडम , काळे मावशी , इत्यादी शिक्षक वृंद उपस्थित होते ..

यावेळी सर्व माझी विद्यार्थी / विद्यार्थिनी आप आपली ओळख करून देताना शाळेतल्या गमती जमती सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच समाजात वावरताना एकमेकांना आलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी सहकार्य करण्याची भावना सर्वनुमते व्यक्त करण्यात आली. सुत्रसंचलन . शिवनाथ वाडेकर , व सुदाम गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश शेवाळे यांनी केले.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## हैप्पी स्ट्रीट वर दीपावलीचा आनंद लुटाण्यासाठी पुर्णपणे मोकळा



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

भाजप नेते उमेश इनामदार यांच्या मागणीनुसार हैप्पी स्ट्रीट वर दीपावलीचा आनंद लुटाण्यासाठी हा मार्ग पुर्णपणे मोकळा वाहतुक शाखेने करून दिला आहे.

भाजप नेते उमेश इनामदार यांनी वाहतुक शाखेचे कार्यतत्पर आणि तडफदार निरीक्षक औदुंबर पाटील ह्यांच्या निदर्शनास आणुन दिलं आणि नागरिकांना हैप्पी स्ट्रीट वर दीपावलीचा आनंद लुटाण्यासाठी हा मार्ग पुर्णपणे मोकळा करून द्यावा ही विंनती केली होती. त्यानुसार उमेश इनामदार ह्यांनी नागरिकांसाठी केलेल्या विनंतीचा तातडीनी विचार करून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची टीम त्या स्थळी पाठवून वाहतुक निरीक्षक औदुंबर पाटील ह्यांनी हैप्पी स्ट्रीट नागरिकांना वाहनमुक्त करून खुला करून दिला.

# भाजप चे माजी जिल्हा सचिव प्राचार्य राहुल डोंगरे यांचा प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**गोंदिया** - दीपावली मिलन सोहळ्याच्या औचित्याने आज दिनांक 21 ऑक्टोबर 2025 ला भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा सचिव तथा शारदा विद्यालय व कन्या कनिष्ठ महाविद्यालय, तुमसरचे प्राचार्य राहुल डोंगरे सर यांनी प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून गोंदिया येथे राष्ट्रवादी काँग्रेस( अजित गट) पक्षात प्रवेश केला.



या वेळी मा. प्रफुल्लभाई पटेल (माजी केंद्रीय मंत्री व खासदार), राजेंद्रजी जैन (माजी आमदार) यांच्या हस्ते राष्ट्रवादीच्या दुपट्टयाने व पुष्पगुच्छ देऊन डोंगरे सरांचे स्वागत करण्यात आले.

गरीबीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा दिवा पेटवणारे, बुद्ध, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांनी आपले आयुष्य घडवणारे, विद्यार्थ्यांच्या डोळ्यात स्वप्नं आणि समाजात परिवर्तनाचा उजेड निर्माण करणारे प्राचार्य राहुल डोंगरे हे केवळ शिक्षक नाहीत विचारवंत आणि परिवर्तनाचे वाहक आहेत.

ज्ञान, विचार आणि प्रबोधन हेच ज्यांचे धर्मकार्य. शेकडो व्यासपीठांवरून सत्य, समता आणि न्यायाचे मंत्र उच्चारणारे हे व्यक्तिमत्त्व आता नव्या राजकीय अध्यायाची सुरुवात करत आहे.

विश्वास, नेतृत्व आणि परिवर्तन या तिन्ही आधारस्तंभांवर उभा राहून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून समाजकारणाच्या नवा पर्वाला प्रारंभ केला आहे.

या प्रसंगी मा. राजूभाऊ कारेमोरे (आमदार, तुमसर-मोहाडी), राष्ट्रवादी काँग्रेसचे तुमसर तालुका अध्यक्ष देवचंद ठाकरे, शहर अध्यक्ष योगेश सिंगनजुडे, अल्पसंख्याक सेल तुमसर चे अध्यक्ष यासीन छवारे,संकेत गजभिये तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रवेशानंतर त्यांच्या समर्थकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून, “विचारांच्या प्रवासाला आता नवी दिशा मिळाली” अशा शब्दांत सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे.

## सणसर भोईटेवस्ती येथील अखंड हरीनाम सप्ताहाची शनिवारी सांगता

### ह.भ.प.पद्माकर महाराज देशमुख अमरावतीकर यांच्या कीर्तनाने ग्रामस्थ मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील भोईटेवस्ती येथे अखंड सप्ताह गेल्या 30 वर्षांपासून सालाबादप्रमाणे दीपावलीच्या धनत्रयोदशीला श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते अशी माहिती राष्ट्रवादी काँगेस (अजित पवार) पुणे जिल्हा उपाध्यक्ष सागर भोईटे यांनी दिली यावर्षी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार यांनी येऊन आपली सेवा देण्यात आली होती या सप्ताहा साठी सणसर भोईटेवस्ती व पंचक्रोशीतील संप्रदायिक भाविकांनी मोठया प्रमाणात दररोज उपस्थित राहून



सप्ताहात सकाळचा नास्ता दुपारचे जेवण संध्याकाळी जेवण देऊन परिसरातील नागरिकांनी अन्नदान केले शनिवारी सप्ताहाची सांगता करताना सणसर गावाला भोईटेवस्ती वरील सर्व महिलांनी व भाविक यांनी टाळमृदूंग वाजवत गावातून दिंडी प्रदीक्षणा घालून ह.भ.प.पद्माकर महाराज देशमुख अमरावतीकर यांचे काल्याचे सुश्राव्य किर्तन झाले काल्याचे कीर्तनानंतर सप्ताहाची सांगता करण्यात आली.ह.भ.प.हनुमंत बबनराव गायकवाड यांच्याकडून काल्याचा महाप्रसाद देण्यात आला.

अखंड हरीनाम सप्ताह व्यवस्थित पार पाडण्यासाठी सणसर भोईटेवस्ती येथील जेष्ठ मंडळी घनश्याम भोईटे दिलीप भोईटे प्रकाश भोईटे नारायण भोईटे रविंद्र भोईटे हिंदुराव भोईटे प्रकाश भोईटे लीलाधर भोईटे प्रल्हाद कदम मधुकर भोईटे सतीश भोईटे बापूराव भोईटे रामदास निंबाळकर राजाराम रायते महादेव निंबाळकर युवा मंडळी ऋषि भोईटे समीर भोईटे किशोर भोईटे मुकुंद भोईटे प्रदीप भोईटे माधव भोईटे सचिन भोईटे केशव भोईटे कुंडलिक भोईटे व भोईटेवस्तीवरील सर्व जेष्ठ मंडळी युवा कार्यकर्ते आणि महिला मंडळीनी खूप परिश्रम घेऊन सप्ताह व्यवस्थित पार पाडल्याचे दिसून आले.

## जिल्हा परिषद शाळा तेटपाडा येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

गावाच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणाऱ्या आणि अनेक पिढ्यांना ज्ञानदान केलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,तेटपाडा येथे माजी विद्यार्थ्यांचा एक भव्य मेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला. विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेत शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

या मेळाव्याचे उद्घाटन स्थानिक माजी विद्यार्थी लक्ष्मण जाधव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजी विद्यार्थी आणि शाळेतील विद्यमान विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधणे, शाळेच्या गरजांबाबत चर्चा करणे,



तसेच शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य मिळवणे, हे या मेळाव्याचे मुख्य उद्देश होते.

मेळाव्यात सहभागी झालेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि मनोगत व्यक्त केले. शाळेने आपल्या आयुष्याला दिलेली दिशा, मिळालेले शिक्षण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन याबद्दल अनेकांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शाळेच्या विकासासाठी सर्वतोपरी मदतीचे आणि सहकार्याचे आश्वासन दिले. तसेच विद्यार्थ्यांनी पेसा समितीच्या माध्यमातून शाळेस एक ट्रॉली स्पीकर भेट दिले.

मेळाव्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, शाळेतील जुन्या आणि दुर्मिळ छायाचित्रांचे आकर्षक प्रदर्शन भरवण्यात आले होते, ज्यामुळे उपस्थित असलेल्या सर्वांना भूतकाळात रममाण होण्याची संधी मिळाली. जुन्या पिढीला मार्गदर्शन करणाऱ्या आणि आजही ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

आयोजना प्रसंगी लक्ष्मण जाधव,मनोहर जाधव,विनायक चव्हाण,रामजी जाधव,खंडू चव्हाण,ईश्वर पवार,मुख्याध्यापक विनायक चौधरी,उपशिक्षक आनंदा बागुल यांच्यासह गावातील नागरिक, माजी विद्यार्थी, आणि विद्यमान विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा मेळावा केवळ आठवणींचा नव्हता, तर शाळेच्या उज्ज्वल भविष्याची आणि माजी-विद्यमान विद्यार्थ्यांमधील नात्याची नवी वीण गुंफणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

## पाण्याच्या तलावात पडल्याने मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पाण्याच्या तलावात पडून 38 वर्षीय इसमाचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

दिनेश दत्ताराम पाटेकर हा चेतूज फार्म हाऊस,. मालडुंगे येथे केअरटेकर म्हणून काम करतो. 22 ऑक्टोबर रोजी मालडुंगे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या तलावात पडून बुडून त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## वाहनाच्या धडकेत अनोळखी इसमाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत अनोळखी इसमाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 20 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस या अनोळखी इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

35 वर्षीय अनोळखी इसम हा पुणे ते मुंबई जुने हायवे रस्त्यावरील दांड फाट्यापुढे यश लॉजच्या बाजूला रस्त्याच्या कडेला जात असताना अनोळखी वाहनाने धडक दिली. त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले होते. यावेळी त्याचा मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या 35 वर्षीय इसमाचा वर्ण सावळा, उंची साडेपाच फूट, केस काळे, बांधा मजबूत आहे. त्याच्या उजव्या दंडावर तीळ, कपाळावर मधोमध तीळ, अंगात पांढरा शर्ट आहे. या मृत इसमाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा.

### शिवसेनेतून राष्ट्रवादीत प्रवेशलेल्या रुपेश पाटील यांच्यावर

## कोकण प्रदेश संघटक तथा उरण पनवेल मतदार संघाचे निरीक्षक म्हणून जबाबदारी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

गेली अनेक वर्षे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या छायेत काम करणारे सचिव रुपेश पाटील यांनी गेल्या आठवड्यात राष्ट्रवादी पक्षाची कास धरली, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या माध्यमातून त्यांनी आपल्या शेकडो पदाधिकाऱ्यांसोबत राष्टवादीत प्रवेश केला. त्यांचे कोकणातील काम पाहून आणि लोकांसोबत असलेली कनेक्टिव्हिटी पाहून त्यांना राष्ट्रवादीने निवडणुकीच्या वातावरणात पक्ष वाढीची मोठी जबाबदारी दिली आहे.

त्यांना कोकण प्रदेश संघटक तथा, पनवेल व उरण विधानसभेतील असलेल्या राजकीय अनुभवावरून त्याना दोन्ही मतदार संघ म्हणजे उरण व



पनवेल मतदार संघाचे निरीक्षक म्हणून सुद्धा जबाबदारी दिली आहे. ह्या बाबत बोलतांना रुपेश पाटील यांनी स्पष्ट केले कि राष्ट्रवादीत प्रामुख्याने तटकरे साहेबांचा अनुभव व कामाची पद्धत ह्याने मी प्रभावित झालो होतो, सामान्य लोकांपर्यंत पोहचण्याचा त्यांचा स्वभाव व त्यांचे काम उल्लेखनीय आहे, ह्याच धर्तीवर राष्ट्रवादीत कार्य करण्याचा मानस असून, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब तथा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब याना अपेक्षित असेलेले काम माझ्याकडून घडेल ह्यात वाद नाही, पनवेल आणि उरण मध्ये सुद्धा येत्या काळात राष्ट्रवादी पक्षाची महत्वाची भूमिका असेल हे हि त्यांनी स्पष्ट केले. ह्यावेळी त्यांनी मंत्री अदितीताई तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे आभार मानले.

## रो हाऊसला लागली आग , एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवीन पनवेल शहरातील सेक्टर 4 येथील रो हाऊसला लागलेल्या आगीत एका इसमाचा मृत्यू झाला. या आगीमध्ये रो हाऊसचे नुकसान झाले. अग्निशामक विभागाने ही आग विझवली. पत्नी सोबत झालेल्या वादातून पतीनेच ही आग लावली असल्याचे समोर आले आहे.

कॉटेज, एनजी, प्लॉट नंबर 89, सेक्टर 4, नवीन पनवेल या ठिकाणी रो हाऊसला दुसऱ्या माळ्यावर 24 ऑक्टोबर रोजी दुपारी १२ च्या सुमारास आग लागल्याची माहिती अग्निशामक दल, नवीन पनवेल यांना देण्यात आली. यावेळी या ठिकाणी गॅलरीतून मोठ्या प्रमाणात आग दिसत होती. या ठिकाणी पहिल्या मजल्यावर आणि तळमजल्यावर वृद्धाश्रम



होते. त्यामुळे धुराचे लोट वृद्धाश्रमात येऊ लागले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मयूर शेळके, अग्निशामक विभागाचे जयेश ठाकूर आणि पालिकेच्या गार्डने या वृद्धाश्रमातील वृद्धांना सुखरूपपणे खाली आणले. त्यामुळे त्यांचे जीव वाचले. यावेळी अग्निशामक विभागाने दरवाजा तोडून आग विझविली. आणि काही क्षणातच आगीवर नियंत्रण मिळवले. यावेळी दुसऱ्या मजल्यावर एक इसम बेशुद्ध अवस्थेत पडला होता. रुग्णवाहिकेने त्याला रुग्णालयात दाखल केले मात्र त्याचा मृत्यू झाला.

त्यांचा मृत्यू आगीमुळे गुदमरून झाला की अन्य कारणामुळे झाला हे अद्याप समजू शकलेले नाही. यावेळी वरच्या फ्लोअरवर कुत्रा देखील अडकला होता त्याची देखील सुखरूपपणे सुटका करण्यात आली. कुटुंबीयांना घाबरवण्यासाठी जेकब यांनी ही आग लावली असल्याचे बोलले जात आहे. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

## पहेला येथे संगीत चिंगारी नाटक व सत्कार सोहळ्याचे आयोजन 30 ऑक्टोबरला

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - तालुक्यातील मौजा पहेला येथे बाल युवा सांस्कृतिक व क्रीडा मंडळ च्या वतीने दिवाळीच्या शुभ पर्वावर खास नवमीच्या मंडई निमित्त 30 ऑक्टोबर 2025 ला रात्री ९ वाजता रोज गुरुवारला मोफत संगीत चिंगारी नाटक व सत्कार सोहळ्याचे आयोजन श्री हनुमान देवस्थान येथील रंगमंचकावर करण्यात आलेले आहे. वरील नाटकाचे उद्घाटन कविताताई उईके अध्यक्ष जिल्हा परिषद भंडारा, सहउद्घाटक सुभाष आजबले अध्यक्ष सहकारी पतसंस्था वाकेश्वर, कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद नखाते अध्यक्ष हनुमान देवस्थान कमिटी, दीप प्रज्वलन काजल चवळे पंचायत समिती सदस्या ,दीपक वानखेडे उद्योजक राईस मिल पागोरा, ओमप्रकाश नकाते, देवानंद




वैरागडे ,यांचे उपस्थितीत होईल. मार्गदर्शक म्हणून मंगलाताई ठवकर सरपंच,विजय भुरले माजी मुख्याध्यापक , तर विशेष अतिथी म्हणून सुशील बांडेबुचे उपसरपंच, विकास भुरले तंटामुक्ती समिती अध्यक्ष, सखाराम चवळे अध्यक्ष विविध कार्यकारी सहकारी संस्था, चंद्रशेखर खराबे पोलीस पाटील, संजीव भांबोरे राज्य सरचिटणीस प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य, यामिनी बांडेबुचे माजी जि. प. सदस्या , व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होईल. करिता या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश बोंद्रे, उपाध्यक्ष सुशील बांडेबुचे ,सचिव रामेश्वर खराबे ,सहसचिव श्रीकृष्ण कहालकर, कोषाध्यक्ष गुलाब चवळे ,यांनी केलेले आहे.

## पेहचान प्रोजेक्ट” – आदिवासी समाजाच्या ओळखीचा प्रवास

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे**

टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या उपक्रमा अंतर्गत व अश्वपरीस फाऊंडेशन, खोपोली यांच्या सहकार्याने “पेहचान प्रोजेक्ट” अंतर्गत निशुल्क जात प्रमाणपत्र वितरण व जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ २३ सप्टेंबर २०२५ रोजी खोपोली येथे करण्यात आला असून, हा प्रकल्प खालापूर तालुक्यातील आदिवासी कुटुंबांना स्वतःची ओळख निर्माण करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

**या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :**

जात प्रमाणपत्राच्या महत्त्वाबाबत जागरूकता निर्माण करणे.,लक्षित कुटुंबांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी महसूल विभागाशी समन्वय साधणे., शासनाच्या विविध



सेवा व सवलतींचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवणे., वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे.

समान हक्क, सन्मान आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश समाजात पोहोचवणे., प्रत्येक घटकाला स्वावलंबी बनवून समाजाच्या प्रगतीसाठी एकत्र आणणे.

या उपक्रमात अश्वपरीस फाऊंडेशनचे कार्यकर्ते गावोगावी व वाड्यावाड्यांत जाऊन आदिवासी समाजाशी संवाद साधत आहेत व त्यांना शासन योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत.

**फाऊंडेशनचे ध्येय आहे:-**

आदिवासी जात प्रमाणपत्राचे प्रमुख फायदे

1. शिक्षणातील आरक्षण:

शाळा, कॉलेज, विद्यापीठे, आणि सरकारी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षण:

प्रवेश प्रक्रियेत व शुल्कात सवलत:

विशेष शिष्यवृत्ती योजना (Scholarships) व शैक्षणिक मदत:

सरकारी नोकरीत आरक्षण:

केंद्र व राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये ७.५% (किंवा राज्यनिहाय) आरक्षण:

स्पर्धा परीक्षांमध्ये अर्ज शुल्कात सवलत किंवा सूट:

पदोन्नतीमध्ये (pro-motion) काही प्रमाणात आरक्षणाची सुविधा:

गृहनिर्माण व जमीन हक्क:

आदिवासी घरकुल योजना, वनहक्क कायदा (FRA) अंतर्गत जमिनीचा मालकी हक्क.

गावठाण किंवा जंगल भागात स्थायिकतेचा कायदेशीर पुरावा म्हणून वापर.

आर्थिक व स्वयंरोजगार योजना:

लघुउद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य:

कायदेशीर संरक्षण:

सामाजिक अन्याय किंवा भेदभाव झाल्यास न्याय मिळविण्यास मदत:

राजकीय प्रतिनिधित्व:

आरोग्य व सामाजिक सुविधा:

अशा अनेक सुविधा आदिवासी बांधवाना मिळाव्यात ह्यासाठी टाटा स्टील अग्रेसर आहे.

समाजाप्रती योगदान असावे हि भावना मनात ठेऊन हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी टाटा स्टील फाऊंडेशन सदस्य, अश्वपरीस संस्थापक अध्यक्ष इशिका शेलार, बनिता सहा, सुरेखा नायकर, कार्तिक इटी, सबीना,कुणाल काकडे, जावेद मालदार,परिसा शेलार,मारुती वाघमारे,दिलीप ढाके,विठोबा वाघमारे, गणेश वाघमारे यांच्या सक्रिय सहभागामुळेच “पेहचान प्रोजेक्ट” यशस्वी ठरत आहे

या उपक्रमाद्वारे आदिवासी समाजाला नवी ओळख, हक्क आणि सन्मान मिळत आहे.

# बद्धकोष्ठतेसाठी किवी परिणामकारक?

व्यायाम, भरपूर पाणी, आहारात फायबर्सचं चांगलं प्रमाण, योग्य झोप हे पोट साफ होण्यासाठी असलेलं सूत्र सर्वांनाच माहिती आहे. पण तरीही पोट साफ होत नाही ही अनेकांसाठी समस्याच असते.पूर्वी बहुतांश ज्येष्ठ नागरिकांमध्ये असलेली ही समस्या आता तरुणवर्गात अत्यंत सहज दिसते. आहारात फायबर म्हणजे तंतुमय पदार्थांचं कमी असणारं प्रमाण, बैठी जीवनशैली आणि हालचालीचा अभाव याचा पोटावर आणि पचनक्रीयेवर परिणाम होतो आणि बद्धकोष्ठतेला सामोरं जावं लागतं.बद्धकोष्ठता हा आजार एकटाच येत नाही तर बरोबर मूळव्याध, फिशर, फिश्चुला मग आतड्याचे, गुदाशयाचे आजार असे सहकारी आजार घेऊन येतो. त्यामुळे बद्धकोष्ठता या मूळ आजारावर अनेक संशोधनं आणि त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न सुरू असतो.

आता किवी खाल्ल्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते आणि दिवसभरात आवश्यक असणारे फायबर्स या किवीच्या फळांतून मिळतात असं डॉक्टरांना दिलेल्या एका नव्या मार्गदर्शक सूचनावलीत म्हटलं आहे.किवीची फळं आपल्याकडे आता नवीन नाहीत. वरुन थोडीशी केसाळ आणि चिकूच्या रंगाची ही फळं सर्वत्र मिळतात. आतून हिरव्या रंगाची ही फळं चवीला आंबट-गोड असतात. सी व्हीटॅमिन भरपूर असलेलं हे फळ सर्वच लहानमोठ्या शहरांत आणि गावांमध्ये मिळायला लागलं आहे. या सूचनावलीत आणखी एक माहिती दिली आहे, ती म्हणजे पाण्याबद्दल. जर नेहमीच्या पाण्यापेक्षा पाण्यात जास्त खनिजं असतील तसेच मॅग्नेशियम ऑक्साईडची पूरक औषधं घेतली तर पोट साफ होण्यास मदत होते असं यात म्हटलं आहे.

लंडनच्या किंग्ज कॉलेजमध्ये संशोधन करणाऱ्या तज्ज्ञांनी ही सूचनावली तयार केली आहेत. फक्त फायबर्स खा या एका गोष्टीपेक्षा पोट साफ होण्यासाठी अनेक गोष्टी आहेत असं हे तज्ज्ञ म्हणतात.बद्धकोष्ठता हा फक्त एक आजार नसून त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या पूर्ण आयुष्यावर परिणाम होऊ शकतो.

एनएचएस या युकेच्या आरोग्यसंस्थेच्या म्हणण्यानुसार गेल्या आठवड्यात तुम्हाला किमान तीनवेळा तरी शौचाला झालं नसेल तर तुम्हाला बद्धकोष्ठता आहे.शौचाला गेल्यावर फार जोर करावा लागणं किंवा नंतर अजूनही पोट साफ झालेलं नाही असं वाटणं हे सुद्धा बद्धकोष्ठतेचं लक्षण असू शकतं.



अर्थात बद्धकोष्ठतेची काही एवढीच लक्षणं नाहीत.

किंग्ज कॉलेजचे पोषणशास्त्राचे अध्यापक आणि या संशोधनाचे मुख्य संशोधक डॉ. आयरिनी दिमिदी सांगतात, बद्धकोष्ठतेची विविध ३० लक्षणं लोकांनी नोंदवेलली आहेत.दिवसभरात दोन-तीन किवी खा किंवा ८-१० मनुका (प्रून्स) खा असं ते सांगतात. एनएचएस या आरोग्यसेवेच्या माहितीनुसार त्यांनी काही लक्षणं प्रसिद्ध केली आहेत.

जर तुम्ही आठवड्याभरात ३ वेळा तरी शौचालयाला गेला नसाल तुमची विष्ठा मोठी, कोरडी, घट्ट किंवा गाठीसारखी असेल, शौचालयात तुम्हाला फार जोर लावावा लागत असेल किंवा तेव्हा वेदना होत असतील तर

पोटात दुखून ते फुगत असेल किंवा आजारी वाटत असेल तरीही बद्धकोष्ठ असण्याची स्थिती असते.



**किवी सालीसकट खायचं का?**

"साल न काढता खाल्लं तरी चालतं, कारण त्यातही फायबर असतं," असं डॉ. दिमिदी सांगतात. किवीमधील फायबर पचनसंस्थेवर परिणाम करून विष्ठेचा आकार वाढवतं आणि आतड्यांमध्ये संकोच निर्माण करतो.

किवीमुळे पचनसंस्थेत पाण्याचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे विष्ठा मऊ होते. ८-१० प्रून्स आणि थोडा राय ब्रेड खाल्ला तरी असाच परिणाम होतो.

**खनिजयुक्त पाणी आणि मॅग्नेशियमचे फायदे**

डॉ. दिमिदी सांगतात की, खनिजयुक्त पाणी हे नळाच्या पाण्यापेक्षा अधिक फायदेशीर आहे. युकेमधील बाटलीबंद पाण्यात खनिजांचं प्रमाण कमी असतं, तर पूर्व युरोपमध्ये ते अधिक असतं.

मॅग्नेशियम हा एक महत्त्वाचा खनिज घटक आहे, ज्याचा सौम्य रेचक (laxative) परिणाम होतो.

मॅग्नेशियम ऑक्साइड सप्लिमेंट्समुळे पोटदुखी, फुगणे, जोर लावावा लागणे यासारख्या लक्षणांमध्ये सुधारणा होते आणि शौचास जाणं सुलभ होतं.प्रोबायोटिक्सबाबत मार्गदर्शनात म्हटलं आहे की, काही प्रकार लक्षणांमध्ये सुधारणा करू शकतात, पण अनेक प्रोबायोटिक प्रकारांवर अजूनही पुरेसं संशोधन झालेलं नाही.

**नवीन मार्गदर्शन अधिक आधुनिक आणि परिणामकारक**

आतापर्यंत डॉक्टरांसाठी उपलब्ध असलेलं मार्गदर्शन जुनं आणि मर्यादित होतं, ज्यात केवळ फायबर आणि पाणी वाढवण्याचा सल्ला दिला जात असे. आताचे नवीन मार्गदर्शन ७५ क्लिनिकल ट्रायल्सच्या पुराव्यावर आधारित आहे, तसेच त्याचं विश्लेषण तज्ज्ञांच्या पॅनेलने केलं आहे.

प्रोफेसर केविन व्हेलन, ज्येष्ठ संशोधक आणि डाएटेटिक्सचे प्राध्यापक, म्हणतात की हे मार्गदर्शन डॉक्टर आणि रुग्णांना आहाराच्या माध्यमातून बद्धकोष्ठता व्यवस्थापनासाठी सक्षम बनवेल.

ब्रिटिश डायेटेटिक असोसिएशनने या प्रकल्पाला निधी दिला असून, हे मार्गदर्शन पोषणतज्ज्ञ, डॉक्टर आणि परिचारिका यांच्यासाठी एक उत्कृष्ट साधन ठरतं, असं त्यांनी म्हटलं आहे.

## धरणा कॅम्प येथील कृष्णाजीराव कदम यांचे अल्पशा आजाराने निधन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प येथील रहिवाशी कृष्णाजीराव कदम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दि. २९ ऑक्टोबर रोजी भोलेनाथ मंदिर पिसार्व तलाव येथे सकाळी ८:३० वा तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी धरणा कॅम्प येथे होईल. त्यांच्या पश्चात बंधू विजय वामनराव कदम, मुलगा विकास कदम, विपुल कदम, तसेच पत्नी, सून, नातवंडे परिवार आहे.




## सिनेसृष्टीकडे पहिले पाऊल; चिपळूणमध्ये अभिनय कार्यशाळा!

**प्रसिद्ध कास्टिंग डिरेक्टर रोहन मापुस्कर यांचे मार्गदर्शन; मराठी नाट्य परिषद चिपळूणचे आयोजन**

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण प्रतिनिधी**

अभिनयाची आवड असलेल्या तरुणांना आणि इच्छुकांना आता सिनेसृष्टीकडे वाटचाल करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा चिपळूण यांच्या वतीने दोन दिवसीय अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कास्टिंग डिरेक्टर रोहन मापुस्कर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडणार आहे. मुंबई आणि पुण्यात अभूतपूर्व यश मिळवल्यानंतर कोकणात प्रथमच ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा चिपळूणचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन यांनी दिली.

ही कार्यशाळा १ आणि २ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवसांदरम्यान दुपारी २ ते सायं. ८ या वेळेत इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र, चिपळूण येथे होणार आहे. कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे अभिनय क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या युवकांना कॅमेरा समोर आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी आणि ऑडिशन प्रक्रियेची सखोल माहिती



मिळवण्यासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे हे आहे.

कार्यशाळेची वैशिष्ट्ये म्हणून कॅमेरा फेसिंग तंत्रज्ञान, ऑडीशन मार्गदर्शन, ॲक्टींग इम्प्रोवायजेशन तसेच भरपूर प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश आहे. या कार्यशाळेसाठी वयोमर्यादा १५ वर्षांपासून पुढे अशी ठेवण्यात आली असून फी फक्त ₹१००० इतकी आहे. सहभागासाठी मर्यादित जागा असल्याने इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करणारे रोहन मापुस्कर हे 'थ्री इडियट्स', 'मुन्नाभाई एमबीबीएस' या लोकप्रिय हिंदी चित्रपटांमध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणून कार्यरत होते. तसेच 'एप्रिल-मे ९९' या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले आहे. 'झोंबिवली', 'स्माईल प्लीज', 'वाळवी', 'वेड', 'ठाकरे', 'सचिन', 'आत्मपॅम्प्लेट', 'उनाड', 'व्हेंटिलेटर', 'हिरकणी', 'रूपनगर के चिते' अशा अनेक मराठी चित्रपटांचे ते कास्टिंग डिरेक्टर राहिले आहेत.

त्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अभिनय शिकण्याची आणि सिनेसृष्टीच्या प्रत्यक्ष अनुभवाची संधी कोकणातील नवोदित कलावंतांना मिळणार आहे. कार्यशाळेबाबत अधिक माहितीसाठी योगेश बांडागळे (९९२३४२८८३८) आणि ॲड. विभावरी राजपूत (७७९६७२९५८७) या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा.

या कार्यशाळेबाबत माहिती देताना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा चिपळूणचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन यांनी सांगितले की, "या उपक्रमातून कोकणातील अभिनय क्षेत्रातील नवोदितांना योग्य दिशा मिळेल.

सुप्त कलागुणांना वाव मिळून सिनेसृष्टीकडे पहिले पाऊल टाकण्यास मदत होईल," असे त्यांनी नमूद केले.

## तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक; खेळाडू सेरेना म्हसकरचे क्रीडा मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी केले अभिनंदन

**मुंबई :** बहरीनमधील मनामा येथे आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये पूर्ण विजय मिळवत सुवर्ण पदक पटकावले. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. या कामगिरीबद्दल क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सेरेनासह भारतीय कबड्डी संघाचे अभिनंदन केले आहे.१९ ते २३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्स क्लबची खेळाडू कुमारी सेरेना म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. मुले आणि मुली या दोन्ही भारतीय संघाने या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावून देशाचा मान उंचावला.या उत्कृष्ट यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी कुमारी सेरेना म्हसकर हिचे तसेच प्रशिक्षक,



पालक व स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले की, "महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी ही राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे. शासनाकडून अशा प्रतिभावंत खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल."सेरेनाच्या या यशामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून क्रीडाक्षेत्रातील नवोदितांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे. अंतिम फेरीत, दोन्ही भारतीय संघ इराणविरुद्ध आमनेसामने आले, परंतु सामने अगदी वेगळ्या शैलीत झाले.

# लोकवाद्यांचे संवर्धन : परंपरेचा स्वर आणि संस्कृतीचा श्वास

सांस्कृतिक अभ्यास म्हणजे — संस्कृतीची निर्मिती, प्रसार, प्रभाव आणि तिच्या सामाजिक संदर्भाचा समग्र व चिकित्सक अभ्यास. लोककलेतील प्रत्येक कलाप्रकाराचा संशोधनात्मक अभ्यास करताना, त्या कलांमधून उमटणाऱ्या जनसामान्यांच्या जीवनपद्धती, विचार, लोकवाद्ये आणि त्यांच्या माध्यमाची भूमिका यांचा सखोल वेध घ्यावा लागतो.



जशी लोककला ही जनमानसाची अभिव्यक्ती असते, तशीच लोकवाद्ये ही परंपरेची हृदयस्पंदने आहेत. काही लोकगायक थाळीचा ताल धरतात, तर कुणी ढोलकी, तुणतुणे, तुतारी, नगारा, सनई, टाळ, चिपळ्या, झांज, भेर, ढोलपाई, टिपरी यांसारख्या देशी वाद्यांच्या साथीने सूर लावतात. या लोकवाद्यांचा नाद हा ग्रामिण जीवनाच्या मातीशी एकरूप झालेला आहे. भवाडा, तमाशा, कीर्तन, दशावतारी खेळ, लावणी, पोवाडा, नमन, खडी गंमत अशा विविध लोककलांमध्ये ही वाद्ये केवळ साथीदार नाहीत, तर कलात्म्याचा अविभाज्य श्वास आहेत.

अभिजात वाद्ये जशी कुशल कारागिरांच्या हातून साकार होतात, तशी लोकवाद्ये स्वतः लोकांच्या हातांनी जन्म घेतात. प्रत्येक वाद्याची स्वतःची शैली असते. घनवाद्ये, अवनद्ध, सुषिर आणि तंतुवाद्ये अशा चार विभागांत त्यांचे वर्गीकरण केले जाते. आश्चर्य म्हणजे, अभिजात संगीतातील वाद्यांपेक्षा लोकसंगीतात वाद्यांची विविधता अधिक आहे — कारण ही वाद्ये जनतेच्या हातांनी, त्यांच्या भावनेच्या मातीपासून बनलेली असतात

**लोकवाद्यांचे प्रदर्शन - परंपरेचा सन्मान**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि संचालनालयाच्या वतीने अलीकडेच "दुर्मिळ व पारंपारिक लोकवाद्यांचे प्रदर्शन" मुंबईत आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाला मुंबईकरांनी प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरवासीयांनी ग्रामीण परंपरेचा हा सजीव वारसा पाहून कुतूहल आणि अभिमान व्यक्त केला

ग्रामीण भागातील कलावंतांना त्यांच्या पारंपारिक वाद्यांसह एकत्र आणणे हे सोपे काम नव्हते. अनेक कलावंत हे भटके आणि विमुक्त जमातींतील — "पाठीवर बिऱ्हाड, गावोगावी वरात" अशी त्यांची जीवनशैली. पण या सर्वांना एकत्र आणून मुंबईत सादर करण्याचे श्रेय सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्री. बिभीषण चवरे यांना दिलेच पाहिजे. त्यांनी आपल्या जिद्दीने आणि समर्पणाने ही अनोखी संकल्पना वास्तवात उतरवली.

**लोकवाद्यांचा उत्सव - लोकजीवनाचा स्वर**

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या कलांगणात झालेल्या या महोत्सवात राज्यभरातील कलावंतांनी भाग घेतला.अहमदनगर जिल्ह्यातील स्मशान जोगी लक्ष्मण शेंडरे, हनुमंता कडमी, डक्कलवार धर्मा कांबळे, रामा यशवंत वीर, गोंधळी दिगंबर गोंधळी, पिंगळा जोशी दिलीप वायफळकर, मारुती शिंदे, राजू शिंदे, शिवाजी थिटे असे अनेक लोककलावंत घाटोळे, शंख, किंगरी, संबळ, दिमडी, गुडगुडी, सारंगी यांसारखी दुर्मिळ वाद्ये घेऊन सहभागी झाले.

नाशिक, पालघर, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांतील आदिवासी कलाकारांनी तर पारंपारिक तारपा, तुर, गांगळी, डाक, सुरथाळ, सनई, संबळ या वाद्यांच्या नादाने वातावरण भारावून टाकले. विवाह सुनाड, अर्जुन नडगे, जाना देऊ, गोविंद गंगा, राजन वैद्य अशा कलाकारांनी आपली मौलिक कला सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

**संवर्धनाची गरज — परंपरेचे जतन**

लोकवाद्यांना एक समृद्ध आणि प्राचीन परंपरा आहे. पण आज ती लोपाच्या मार्गावर आहे. कारण — वादक संपला की वाद्यही संपते. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे या लोकवाद्यांचे जतन आणि संवर्धन करणे हे शासनासमोर मोठे आव्हान उभे आहे.लोकजीवनात सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंमधूनच ही वाद्ये बनतात. माती, बांबू, चामडे, धातू, लाकूड यांपासून नादाचा हा विश्व उभा राहतो. त्यामुळे या वाद्यनिर्मितीचे प्रशिक्षण शिबिरं जिल्हास्तरावर नियमित आयोजित केली गेली, तर पुढील पिढीलाही या परंपरेचा परिचय होईल.

संचालक बिभीषण चवरे यांची हीच संकल्पना होती — दुर्मिळ आणि पारंपारिक लोकवाद्यांचे जतन करून त्यांचा परिचय भावी पिढीला करून देणे. त्यांनी गेल्या कित्येक दिवसांपासून कोणताही गाजावाजा न करता या दिशेने प्रयत्न केले आणि अखेर ती संकल्पना प्रत्यक्षात आणली.

लोकजीवनात सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूपासून पारंपारिक वाद्ये बनविली जातात.जर ही पारंपारिक वाद्य बनविण्याचे प्रशिक्षण किंवा दरवर्षी दुर्मिळ आणि पारंपारिक संगीतवाद्य प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्याची संकल्पना संचालक बिभीषण चवरे यांनी प्रत्यक्षात अंमलात आणली, तर लोककलेवर प्रेम करणारी पुढची सात पिढी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांच्या कार्याला कधी विसरू शकणार नाही.हे मात्र निश्चित आशादायी वाटते.

**- ले.खंडूराज शं.गायकवाड**

# अवकाशाचे आवाहन


भारताच्या अवकाशविज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांचे काम हा भारताच्या विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा दस्तावेजच...

आपल्याकडे विज्ञानाबाबतही सगळा वलयाचा मामला. ज्याच्या नावे एकही संशोधन नाही असे, केवळ भाभा अणुसंशोधन केंद्रातील चाकरीची पुण्याई असणारे आणि काही तर केवळ विज्ञानकथा सांगणारे... अशा सगळ्यांनाच येथे वैज्ञानिक म्हटले जाते. कोणालाही विचारवंत असा किताब द्यावा तसेच हे. आणि सध्याचा काळ तर काही सेकंदांच्या 'रील'मध्ये मावणाऱ्या कर्तृत्वाला नमन करण्याचा. दर श्वासागणिक जिथे नवा तारांकित लागतो, तिथे समग्र आयुष्य विज्ञानालाच समर्पित असलेल्यांची कथा सांगणार कोण? आणि सांगितली, तरी या वावदुकी वातावरणात ऐकणार कोण? एखाद्या वाक्याच्या वा मोजक्या शब्दांच्या आत्मचरित्रात विरून जाणाऱ्या 'स्टोरी'इतके भागधेय उरणे, हा केवळ त्या व्यक्तीवर तर अन्याय आहेच; पण तो व्यक्तीला तेवढ्यातच बंदिस्त करणाऱ्यांचा करंटेपणाही. अर्थात, शतायुषी शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांना तर निधनानंतर एवढेही भाग्य अपवादानेच मिळाले असेल. म्हणूनच त्यांची फक्त स्मरणनोंद न लिहिता त्यांची महत्ता सविस्तर सांगायला हवी. भारताच्या अवकाशविज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे चिटणीस यांचे काम ही फक्त त्यांच्या कार्यकर्तृत्वातील एकेका प्रसंगाची गोळाबेरीज नाही, तर तो भारताच्या स्वातंत्र्योत्तर विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा मोठा दस्तावेज आहे, जो उद्याच्या विज्ञानवाटेची दिशा ठरविण्यासाठी धोरणकर्त्यांनीही अभ्यासायला हवा.

चिटणीस मूळचे कोल्हापूरचे. शिक्षणासाठी पुण्यात आले. तत्कालीन पुणे विद्यापीठात पदार्थविज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर काही काळ ते गुजरातमधील एका गावात व्याख्याते म्हणून काम करत. ओढा संशोधनाकडे असूनही तो काळ असा की, संशोधनासाठी पुरेशा सुविधा नसल्याने मास्तरकीवाचून गत्यंतर नव्हते. अर्थात, कालांतराने संशोधन सहायक म्हणून काम मिळाले. आणि, मग थेट अमेरिकेत मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात 'एमआयटी'मध्ये त्यांना संशोधनाची संधी मिळाली. रुढार्थाने स्थिरस्थावर झालेले असताना, त्यांना खुद्द विक्रम साराभाईंनी भारतात परतण्यासाठी हाक दिली. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतासमोर भूक, रोगराई, गरिबी या समस्या आ वासून उभ्या होत्या. त्या विज्ञानाच्या मार्गे सोडविण्यासाठी भारतात परत ये, अशी साराभाईंची साद होती आणि त्याला चिटणीसांनी लगेच प्रतिसाद दिला. काही कालावधीत चिटणीस हे इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रीसर्च- 'इन्कोस्पार'चे सदस्य-सचिव झाले. याच 'इन्कोस्पार'चे रूपांतर १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'त झाले. चिटणीस हे त्या अर्थाने 'इस्रो'ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महत्त्वाच्या वैज्ञानिकांपैकी एक.

'एमआयटी'तून परत आलेल्या चिटणीसांना साराभाईंनी पहिले काम दिले, ते रॉकेट प्रक्षेपणासाठी भारतात योग्य जागा निवडण्याचे. चिटणीस यांनी पाच महिन्यांच्या अथक शोधानंतर केरळातील तिरुअनंतपुरममधील थुंबा ही





पृथ्वीच्या चुंबकीय विषुववृत्तानजीकची जागा त्यासाठी सुचवली. संशोधनासाठी, रॉकेट प्रक्षेपणासाठी हीच जागा उत्तम, यावर बऱ्याच चर्चांनंतर एकमत झाले आणि वर्षभरातच नोव्हेंबर १९६३ मध्ये 'नासा'च्या मदतीने, वातावरणाचा अभ्यास करणाऱ्या नाइके-अपाचे या रॉकेटचे येथून प्रक्षेपणही झाले. भारतीय शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज देण्यासाठी याचा उपयोग झाला. या रॉकेटचे भाग सायकलींवर आणि बैलगाड्यांतून प्रक्षेपणाच्या ठिकाणी आणण्यात आले होते, हे आज सांगितले, तरी आश्चर्य वाटेल. पण, भारताच्या अवकाश विज्ञानातील भरारीची आस लागलेल्या वैज्ञानिकांच्या दृढनिश्चयी भूमिकेची आणि समर्पित वृत्तीची आठवण करून देण्यासाठी ते पुरेसे ठरावे. थुंबा येथील ही जागा आज विक्रम साराभाई अवकाश केंद्र म्हणून ओळखली जाते. पहिले रॉकेट प्रक्षेपित करण्यासाठी ज्या राष्ट्रांची मदत लागली, त्यांची रॉकेट आज येथून प्रक्षेपित होतात. यातून, 'अवकाशविज्ञानात भारताची झेप प्रचंड असेल,' असे भाकीत चिटणीस यांनी भारताच्या १०० व्या अवकाश मोहिमेवेळी काही वर्षांपूर्वी केले होते, जे प्रत्यक्षात येताना दिसते.

विज्ञान संशोधन पुढे जायचे असेल, तर त्यामागे राजकीय नेतृत्व प्रभावीपणे उभे राहण्याची गरज असतेच. चिटणीसांनीच काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत याचे महत्त्व सांगितले होते. त्या वेळच्या सोव्हिएत महासंघाने १९५७ मध्ये 'स्पुटनिक'चे प्रक्षेपण केले. या घटनेने अमेरिकेला आश्चर्याने तोंडात बोटे घालायला लावलीच, शिवाय आपण मागे राहून चालणार नाही, हाही संदेश अमेरिकेत पोहोचला. भारतातील वैज्ञानिक हे सर्व पाहत होते. साराभाईंच्या पुढाकाराने अहमदाबादेत उभ्या राहिलेल्या 'फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी'मध्ये त्या वेळी पृथ्वीच्या वातावरणाच्या बाहेरून येणाऱ्या किरणोत्सर्गांचा आणि त्यामुळे घडत असलेल्या आयनोस्फीअर, कॉस्मिक किरणे अशा घटनांचा अभ्यास सुरू होता. 'स्पुटनिक'च्या उड्डाणानंतर त्याला आणखी दिशा मिळाली आणि भारत अवकाश कार्यक्रम हाती घेण्याच्या दिशेने गेला. तिसरी पंचवार्षिक योजना तोवर तयार झालेली असल्याने त्यात यासाठी तरतूद नव्हती, पण याचे महत्त्व लक्षात आले ते पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना. त्यांनी लगेच निधीची व्यवस्था केली. आण्विक आणि अवकाश संशोधन क्षेत्रांत संशोधन करायचे तर अपयशांसाठी तयार राहावे लागते. ती तयारी असणारे विज्ञानप्रेमी राजकीय नेतृत्व असेल, तरच संशोधन पुढे जाते, याचा जिवंत इतिहास चिटणीस यांच्या रूपाने आपल्यात होता. तो ते 'इस्रो'च्या प्रत्येक यशस्वी कार्यक्रमानंतर सांगत राहिले. विज्ञान संशोधनात पुढे जाण्यासाठी मागच्यांच्या कर्तृत्वाचा हा इतिहास समजून घेणे महत्त्वाचे.

असे चिटणीस नुकतेच शयायुषी होऊन निवर्तले. चिटणीस यांच्या जाण्याने स्वतंत्र भारतातील वैज्ञानिकांच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे वैज्ञानिक आपल्यातून गेले, हे समजून घेतले, तर भारतीय अवकाश संशोधनाचा आजच्या तंत्रज्ञान युगाशी सांगड घालणारा किती मोठा दुवा निखळला आहे, हे लक्षात येईल. आज संपर्कजाळे आपल्या जगण्याच्या मूलभूत गरजांपैकी एक गरज बनले असताना, चिटणीस हे 'इंडियन नॅशनल सॅटेलाइट सिस्टीम' अर्थात 'इन्सॅट' कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्यांपैकी होते, याची आठवण ठेवावी लागेल. सुदूर संवेदन उपयोजने आणि अवकाशाधारित संज्ञापन प्रकल्प उभारण्यात त्यांचे योगदान होते. त्यांच्या या कामातील सहभागामुळे ग्रामीण भारतात दूरचित्रवाणी आणि दूरध्वनी पोहोचण्यास मदत झाली. पुढे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्र अर्थात 'ईएमआरसी'ची स्थापना करण्यातही त्यांचा पुढाकार होता. शिक्षणाचे दूरचित्रवाणीच्या माध्यमातून सार्वत्रिकीकरण करण्याचा हा प्रयोग होता. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (पीटीआय) या वृत्तसंस्थेशीही ते नंतर संलग्न राहिले. विज्ञान पत्रकारितेला बळकटी देणे हा त्यामागचा उद्देश. एक प्रकारे तंत्रज्ञानाद्वारे बहुतांच्या अंतरी ज्ञान पोहोचवण्याचा वसा घेतलेला हा वैज्ञानिक होता. एखादी व्यक्ती शंभर वर्षे जगते, तेव्हा त्यांच्या शतायुषी जगण्याचे सोहळे होतात, तब्येतीचे रहस्य वगैरेवर मुलाखती होतात. चिटणीसांच्या शंभराव्या वाढदिनी 'अवकाशविज्ञान, धोरण आणि नवोन्मेषातील अग्रक्रम' या विषयावर विज्ञान संशोधनात कार्यरत जुन्या-नव्यांची एक परिषद झाली. कारण, त्यांचा शंभरावा जन्मदिन हा केवळ शंभरी साजरे करणे नव्हते, तर भारताच्या विज्ञान दृष्टीचा मागोवा होता. अवैज्ञानिक गोष्टींची भलामण करणाऱ्या आजच्या जगात हे विरळाच. चिटणीसांनी स्वत: संशोधनात काम केलेच, पण जोडीने गुणग्राहक राहून संशोधनात चांगले मनुष्यबळही आणले. डॉ. एपीजे अब्दुल कलामांची 'नासा'च्या कार्यक्रमासाठी शिफारस करणारे तेच होते. निवृत्तीनंतरही अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

इतिहास घडवूनही भविष्य साकारायची दृष्टी असलेली माणसे कमी होत असतानाच्या काळात चिटणीस यांचे जाणे नैसर्गिक असले तरी हळहळ निर्माण करते. त्यांच्याच कार्यातून प्रेरणा घेऊन विज्ञान संशोधनासाठीच्या अवकाशाचे आवाहन केवळ यशापुरते नसते- अपयशाचीही तयारी ठेवून संशोधनात पुढे जाण्याचे ते आवाहन असते, हे ओळखण्याची सुबुद्धी आपल्याला मिळणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# मर्चंट नेव्ही मध्ये करिअर करण्याची सुवर्णसंधी



मर्चंट नेव्ही (मेरिटाईम इंडस्ट्री)मध्ये करिअर करण्याची सुवर्णसंधी. मेरिटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (MTI), पवई, मुंबई येथे डिजी शिपिंग (भारत सरकार) द्वारे मंजूर ६ महिन्यांचा जनरल पर्पज रेटींग (जीपी रेटींग) कोर्स आणि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या जहाजावरील १२ महिन्यांचा स्ट्रक्चर्ड शिपबोर्ड ट्रेनिंग घेऊन एनव्हीसी डेक ऑफिसर बनण्यासाठी १८ महिन्यांच्या कोर्सकरिता प्रवेश.

पात्रता – १० वी (इंग्रजी, गणित आणि विज्ञान विषयांसह) किमान सरासरी ४० टक्के गुणांसह उत्तीर्ण. (१० वी किंवा १२ वीला इंग्रजी विषयात किमान ४० टक्के गुण आवश्यक.) किंवा १२ वी (कोणतीही शाखा) किमान सरासरी ४० टक्के गुणांसह उत्तीर्ण. (उमेदवार १० वी (इंग्रजी, गणित, विज्ञान विषयांसह उत्तीर्ण असावा; १० वी किंवा १२ वीला इंग्रजी विषयात किमान ४० टक्के गुण आवश्यक.) किंवा फिटर/मशिनिस्ट/मेकॅनिक/वेल्डर/टर्नर ट्रेडमधील २ वर्षं कालावधीचा आयटीआय कोर्स अंतिम वर्षी किमान सरासरी ४० टक्के गुणांसह उत्तीर्ण. (१० वी/१२ वीला इंग्रजी विषय किमान ४० टक्के गुण आवश्यक.)

अजा/अज उमेदवारांसाठी पात्रता परीक्षेतील गुणांमध्ये ५ टक्के सूट दिली जाईल. (इंग्रजी विषयासाठी ही सूट लागू नाही.) १२ वी (विज्ञान) किमान सरासरी ४० टक्के गुण आणि इंग्रजी विषय ४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

वयोमर्यादा – (प्रवेश घेण्याच्या दिवशी) १७.५ वर्षे ते २५ वर्षे. (कमाल वयोमर्यादेत सूट – अजा/अज – ५ वर्षे, इमाव – ३ वर्षे, महिला उमेदवारांसाठी अधिकची २ वर्षे). शंकासमाधानासाठी ई-मेल आयडी : mti@sci.co.in, फोन नं. ९१८३६९६७६४३९.

कोर्स फी – पुरुष – रु. ४,५०,०००/-; महिला – रु. ३,६०,०००/-. कोर्स फी शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लँड अँड असेट्स लिमिटेड (SCILAL) – MTI, मुंबई यांच्या नावे भरावयाचे आहे. शैक्षणिक कर्ज मिळविण्यासाठी SCILAL – MTI यांचेकडून आवश्यक ती कागदपत्र दिली जातील.

स्टायपेंड – उमेदवारांना १२ महिन्यांच्या स्ट्रक्चर्ड शिपबोर्ड ट्रेनिंगच्या दरम्यान दरमहा रु. १०,०००/- स्टायपेंड दिले जाईल.निवड पद्धती – पात्र उमेदवारांना मुंबई, दिल्ली, कोलकता किंवा चेन्नई केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा द्यावी लागेल. ऑनलाइन परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून रिक्त पदांच्या १:३ प्रमाणात उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निवडले जाईल. ऑनलाइन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची (MCQ) कालावधी २ तास (यात प्रोफेशनल नॉलेज टेस्ट, इंग्लिश लँग्वेज टेस्ट, क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्यूड टेस्ट आणि रिझनिंग ॲबिलिटी टेस्ट यांचा समावेश असेल.) उमेदवारांना प्रत्येक टेस्ट उत्तीर्ण करावी लागेल.

ऑनलाइन परीक्षा दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता घेण्याचे नियोजित आहे.

अर्जाचे शुल्क – अजा/अज/महिला उमेदवार रु. ७००/-, इतरांसाठी रु. १,०००/-.

इंटरव्ह्यूकरिता निवडलेल्या उमेदवारांची यादी आणि इंटरव्ह्यूचा दिनांक, वेळ इ. तपशील https://www.mti.shipindia.com/notification या संकेतस्थळावर जाहीर केला जाईल. इंटरव्ह्यू १८ ते २० नोव्हेंबर २०२५ दरम्यान मुंबई येथे होतील. उमेदवारांना ई-मेल द्वारे सूचित केले जाईल. इंटरव्ह्यूच्या वेळी उमेदवारांकडे इंडियन पासपोर्ट असणे आवश्यक.

ऑनलाइन टेस्ट आणि इंटरव्ह्यू उत्तीर्ण उमेदवारांना समुपदेशनानंतर डीजी शिपिंगद्वारा मान्यताप्राप्त डॉक्टर्सकडून वैद्यकिय चाचणी करून घ्यावी लागेल. यासाठीची फी उमेदवारांनाच भरावी लागेल.

अंतिम निवड यादी MTI च्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.ऑनलाइन अर्ज भरण्याविषयी विस्तृत माहिती https://www.mti.shipindia.com/Notification वर उपलब्ध आहे. ऑनलाइन अर्ज आणि अर्जाचे शुल्क https://sci.marineims.com/applicationform/gprating या लिंकमधून दि. २ नोव्हेंबर २०२५ (२३.५९ वाजे)पर्यंत करावेत.

# कुटूंबासोबत क्वालिटी टाइम का गरजेचा?

बिझी लाइफस्टाइलमध्ये स्वत:साठी वेळ काढणे अवघड झालंय तर कुटूंबातील व्यक्तींसाठी वेळ काढणे दूरचं राहिलंय. हल्ली कित्येकजण शिक्षण आणि कामाच्यानिमित्ताने घरापासून दूर राहत आहेत. ज्यामुळे कुटूंबासोबत फक्त फोनच्या माध्यमातून संपर्कात आहेत. अशावेळी तुम्ही कुटूंबासाठी थोडा वेळ काढायला हवा. कितीही बिझी शेड्यूल असले तरी थोडा वेळ कुटूंबासाठी, प्रिय व्यक्तीसाठी नक्की काढायला हवा. आज आपण जाणून घेऊयात कुटूंबासोबत वेळ घालवणे का गरजेचे आहे? यामुळे नात्यावर काय परिणाम होतो? आणि बिझी शेड्यूलमधून कसा वेळ काढता येईल.



तुम्हाला पूर्ण दिवस वेळ काढणे शक्य नसेल तर डिनर किंवा लंचचा प्लॅन करा. सलग सुट्ट्या येणार असतील तर घरी जाऊन या. आई-वडिलांना सरप्राइज द्या. यामुळे त्यांना सुखद धक्का देऊ शकता.

जेव्हा तुम्ही घरी असता तेव्हा एकत्र जेवण करा. दिवसभरात तुमच्या ऑफिसमध्ये, कॉलेजमध्ये काय घडलं आहे, या गोष्टींबद्दल बोला. असे केल्याने तुमच्या आयुष्यातील लहान-सहान गोष्टी कुटूंबाला कळतील.

कुटूंबासोबत सुट्टीच्या दिवशी चित्रपट पाहू शकता किंवा वन डे पिकनिकचा प्लॅन आखू शकता. यामुळे तुमच्यातील बॉडिंग वाढेल.

बैठे खेळ किंवा मैदानी खेळ एकत्र खेळणे, यामुळे तुमचा मूड सुधारेल आणि कुटूंबासोबत वेळही घालवला जाईल.

**कुटुंबाला वेळ देण्याची गरज का आहे?**

नातेसंबंध सुधारतात – एकत्र वेळ घालवल्याने कुटुंबातील सदस्यांमधील प्रेम आणि आपुलकी वाढते. एकमेकांना समजून घेण्यास मदत होते.


संवाद वाढतो – जेव्हा तुम्ही एकत्र वेळ घालवता तेव्हा तुम्ही एकमेकांशी बोलू शकता, तुमचे अनुभव आणि दिवसातील गोष्टी शेअर करू शकता.

भावनिक आधार – कुटुंबात एकमेकांना भावनिक आधार मिळतो, कारण संकटाच्या वेळी हेच एकमेव आधारस्तंभ ठरतात.

वाद कमी होतात – वेळ न दिल्याने अनेक वेळा गैरसमज होतात आणि वाद निर्माण होतात. वेळ दिल्याने हे वाद टाळता येतात.

एकमेकांना समजून घेणे – एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे महत्त्वाचे आहे.

# सुंदर आणि मजबूत नखांसाठी या योगासनांचा सराव नियमित करा





आजच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या जीवनात, आपण आपल्या शरीराच्या लहानसहान गरजांकडे दुर्लक्ष करतो. बरेच लोक त्यांच्या त्वचेची आणि केसांची काळजी घेतात, परंतु त्यांच्या नखांच्या आरोग्याकडे लक्ष देणे विसरतात. कमकुवत, पिवळे आणि ठिसूळ नखे ही केवळ सौंदर्याची चिंता नसून तुमच्या शरीराच्या अंतर्गत आरोग्याचे लक्षण देखील आहेत.


निरोगी नखांसाठी काही योगासनांचा सराव केल्याने ते निरोगी बनतात. चला तर मग जाणून घेऊ या. रक्ताभिसरणात बिघाड आणि पौष्टिकतेची कमतरता हे नखांच्या आरोग्याचे एक प्रमुख कारण असू शकते. जेव्हा बोटांच्या टोकांपर्यंत रक्त प्रवाह कमी असतो तेव्हा नखांमध्ये आवश्यक पोषक तत्वांचा अभाव असतो, ज्यामुळे ते कमकुवत होतात. नियमित योगाभ्यास हा एक सोपा पण अत्यंत प्रभावी मार्ग आहे हे नखांना आतून पोषण देतात. यामुळे हे सुंदर आणि निरोगी बनतात. या योगासनांचा सराव करा.

**भुजंगासन**

पोटावर झोपून शरीराचा वरचा भाग वर उचलण्याचा हा आसन केवळ पाठ आणि खांद्यांनाच मजबूत करत नाही तर रक्तातील ऑक्सिजन देखील वाढवतो. फुफ्फुसांमधून शरीरात जास्त ऑक्सिजन प्रवेश करतो तेव्हा त्याचे फायदे नखे, त्वचा आणि केसांना देखील मिळतात. भुजंगासनाच्या नियमित सरावामुळे नखांचा रंग उजळतो आणि त्यांना बळकटी मिळते.

**चतुरंग दंडासना**





या योगासनामुळे शरीरातील जवळजवळ सर्व प्रमुख स्नायू सक्रिय होतात. विशेषतः जेव्हा तुम्ही हातांनी तुमचे शरीर जमिनीकडे आणता तेव्हा तळवे आणि बोटांमध्ये रक्तप्रवाह वाढतो. याचा थेट परिणाम नखांवर होतो, त्यांना मजबूत बनवतो आणि ते सहजपणे तुटण्यापासून रोखतो.

**मार्जरासन**

या साध्या दिसणाऱ्या आसनात मांजरीसारखे शरीर पुढे-मागे वाकवणे समाविष्ट आहे. यामुळे मणक्याच्या बाजूने तसेच हात आणि बोटांमध्ये रक्ताभिसरण सुधारते. जेव्हा अंगांमध्ये रक्ताभिसरण सुधारते तेव्हा आवश्यक पोषक तत्वे नखांच्या मुळांपर्यंत पोहोचतात. हे आसन नखे तुटण्यापासून रोखते आणि त्यांच्या वाढीस मदत करते.

**बालासन**

बालासन म्हणून ओळखले जाणारे हे आसन तणाव कमी करण्यास मदत करते. हार्मोनल असंतुलन आणि मानसिक ताण देखील नखांच्या आरोग्यावर परिणाम करतात हे ज्ञात आहे. बालासन शरीराला शांत करते, मज्जासंस्था आराम देते आणि रक्ताभिसरण सुधारते.

# आनंद बुरडचा 'किनारा' – प्रेक्षकांसाठी नवा अनुभव घेऊन सज्ज

**दैनिक युवक आधार**
**आदगाव (कोकण) प्रतिनिधी- किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**





येथील निसर्गरम्य वातावरणात शूटिंग सुरू असलेल्या 'किनारा' या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच पूर्ण झाले आहे. चित्रीकरण संपल्याच्या निमित्ताने चित्रपटाचे मुख्य अभिनेते आनंद बुरड यांच्याशी चर्चा केली असता, त्यांनी सांगितले की हा चित्रपट मराठी प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव घेऊन येईल. 'किनारा' हा चित्रपट विनोदी आणि रहस्यमय या प्रकाराचा असून, त्याचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. आता लवकरच पोस्ट प्रॉडक्शनच्या कामाला सुरुवात होणार आहे. प्रेक्षकांसमोर एक नवी आणि वेगळी गोष्ट आणण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या चित्रपटाची निर्मिती 'अष्टसिद्धी पिक्चर्स' अंतर्गत करण्यात आली असून, अंतोदय नारायण सिन्हा यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे. आनंद बुरड यांच्यासोबत या चित्रपटात अभिनेता प्रताप गाडेकर एका पॉवरफुल नायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. तर पृथ्वी काळे आणि श्रुती गव्हाणे या दोन अभिनेत्री मुख्य नायिकांच्या भूमिकेत आहेत.

'किनारा' चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सुशील शर्मा यांनी केले आहे, तर प्रतीक पाटील यांनी छायाचित्रणाची बाजू सांभाळली आहे. सुरेश अग्रवाल हे क्रिएटिव्ह डायरेक्शन आणि कार्यकारी निर्माता म्हणून काम पाहत आहेत. तसेच, तुषार पाटोळे हे सहयोगी दिग्दर्शक असून, लोकल प्रॉडक्शनची जबाबदारी स्वरूप नाईक यांनी पार पाडली आहे. कला दिग्दर्शन मंदार कुंभार यांनी केले आहे, तर हुर यांनी वेशभूषा, रंगभूषा आणि केशभूषेची जबाबदारी सांभाळली आहे.

या चित्रपटात राजू जोशी, कान्हा तिवारी, आदित्य निघोट, गणेश निगडे, संतोष मोरे, भीमा धानापुणे, किरण मोरे, तसेच कोरिओग्राफर अनिकेत गायकवाड यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. संकलन संकेत गोसावी करत आहेत. पंकज दाभाडे यांनी स्थिर छायाचित्रणाचे काम केले आहे. चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज होत आहे.

# वहाळ जवळ खाडीमध्ये आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**




पनवेल तालुक्यातील वहाळ गाव जवळ समुद्राचे खाडीमधील पाण्यामध्ये एक ३० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. उलवा पोलीस सदर इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. सदर इसमाचे वय अंदाजे ३० वर्षे असून उंची अंदाजे १६५ सेंमी, बांधा मध्यम, चेहरा गोल, केस काळे वाढलेले, राखाडी रंगाचा फूल बाह्यांचा बटनाचा शर्ट, काळया रंगाची ट्रॅकपॅट, उजवे हातावर 'माऊली' असे मराठीमध्ये गोंदलेले, उजवे हातामध्ये धागा व ताबीज बांधलेला, डावे हाताचे अंगठ्याजवळ गोंदलेले असा पेहराव आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास उलवा पोलीस ठाणे किंवा पोउपनि शिवाजी पोफळे यांच्याशी संपर्क साधावा.

# अनपेक्षित अवकाळी पावसामुळे भात कापणी रखडली गेली

## हातातोंडाशी आलेल्या शेतीचे अतोनात नुकसान बळीराजा चिंतेत..

**दैनिक युवक आधार**
**बोरघर / माणगाव**





सध्या निसर्गाचा समतोल बिघडला आहे की काय अशी सर्वत्र शंका व्यक्त केली जात आहे. आपल्या पर्यावरणातील मुख्यत्वे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे प्रमुख ऋतू समजले जातात सरासरी प्रत्येक ऋतूचा कालावधी असतो. मात्र सध्या याचं काहीच ताल तंत्र राहिलेले नाही असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कारण अलिकडे आपण पाहतोय निसर्गात फार मोठा बदल झालेला दिसून येत आहे. देशासह राज्यात कधीही कुठेही अवर्षण प्रवर्षन स्थितीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. राज्यात पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचे सावट, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यानं बळीराजाचे प्रचंड नुकसान झालं आहे. अशात पुढील तीन दिवस राज्यात अवकाळी पावसाचे सावट असणार आहे, असा अंदाज हवामान विभागानं वर्तविला आहे. म्हणजे आधीच अवकाळी पावसामुळे जमीनदोस्त झालेली आणि कापणीला उशीर झालेल्या भात ,नाचणी, वरी, उडीद,तीळ, कुळीथ इत्यादी पिकांचे प्रचंड नुकसान होणार. या चिंतेने कोकणातील बळीराजाला ग्रासले आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे.

या वर्षी मे महिन्यातच राज्यात मान्सून दाखल झाला. त्यामुळे बळीराजाचे पावसाच्या सुरुवातीलाही आणि आता पावसाच्या शेवटी सुद्धा अतोनात नुकसान झाले आहे.अतिवृष्टीनं मराठवाडा तसेच राज्यातील काही भागात मोठ्या प्रमाणात शेतीचं नुकसान झालं आहे मराठवाड्यात तर मुसळधार पावसामुळे पिकांसह घरांचे आणि जनावरांचे नुकसान झाले आहे.या संकटातून अजून बळीराजा सावरत नाही, तोच आता पावसाबाबत हवामान खात्याकडून एक मोठी अपडेट समोर आली आहे

राज्यात पुढील तीन दिवस पावसाचाचा अवकाळी पूर्व-मध्य आणि लगतच्या आग्नेय अरबी समुद्रावरील कमी दाबाचा पट्टा गेल्या २ तासांत २५ किमी प्रतितास वेगाने उत्तर-ईशान्येकडे सरकला. तर २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता पूर्व-मध्य अरबी समुद्रावर, १४.०० उत्तर अक्षांश आणि ७०.६० पूर्व रेखांशाच्या जवळ, पणजी (गोवा) पासून सुमारे ३८० किमी पश्चिम-नैकत्येस, अमिनीदिवी (लक्षद्वीप) पासून ४०० किमी , वाख्येस आणि मंगलोर (कर्नाटक) पासून ४८० किमी पश्चिम-वायव्येस केंद्रस्थानी होता. पुढील २४ तासांत कमी दाबाचा पट्टा पूर्व-मध्य अरची समुद्रातून जवळजवळ उत्तर-ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे. आग्नेय उप सागरावरील बंगालच्या कमी दाबाचे क्षेत्र आग्नेय बंगालच्या उपसागरावरील कमी दाबाचं क्षेत्र गेल्या ३ तासांत हळूहळू पश्चिम वायव्येकडे सरकले आहे. तर आज २४ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार ८.३० वाजता त्याच प्रदेशावर स्थिरावले आहे.

कमी दाबाच्या क्षेत्राचे चक्रीवादळात होणार रुपांतर कमी दाबाचे क्षेत्रपश्चिम वायव्येकडे सरकण्याची शक्यता आहे.

२५ तारखेपर्यंत आग्नेय आणि आहे. लगतच्या मध्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे प्रमाण वाढेल. त्यामुळे २६ तारखेपर्यंत खोल दाबाचे प्रमाण वाढेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

तर २७ तारखेपर्यंत नैऋत्य आणि लगतच्या पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरावर चक्री वादळाचे रूपांतर होईल, असे हवामान विभागानं म्हटलं

अवकाळी पावसाचे कारण काय? अरबी समुद्रात कभी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे हे क्षेत्र उत्तर आणि ईशान्यच्या दिशेनं सरकत आहे.तसेच दक्षिणेकडील कर्नाटक तामिळनाडकडून कमी दाबाचे क्षेत्र वायव्य आणि पश्चिम दिशेदरम्यान प्रवास करत आहे.

कोकण आणि मुंबईसह राज्यातील काही भागामध्ये शुक्रवारी, शनिवारी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. यासह रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या ठिकाणीही रविवारपर्यंत हीच स्थिती असणार आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांना शुक्रवारी आणि शनिवारी पावसाचा 'यलो अलर्टी देण्यात आला आहे. तर दुसरीकडे जळगाव, धुळे, नंदुरबार नाशिक या जिल्ह्यांनादेखील 'यलो अलर्ट' आहे. तर अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांमध्येसुद्धा पावसाची शक्यता असल्याची माहिती मुंबई प्रादेशिक हवामान विभागातील अधिकारी निता शशिधर यांनी दिली.

**अवकाळी पावसामुळे भात कापणी रखडली शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण**

ऑक्टोबर महिन्यात तापमानाचा पारा वाढलेला असतो. तसेच ऑक्टोबर महिन्यात मुंबईत सरासरी ३३ ते ३५ अंश सेल्सिअस असे सरासरी तापमान असते. परंतु यावर्षी दिवाळी संपत आली तरी संपूर्ण रायगड जिल्ह्यासह राज्यात अवकाळी पावसाचा तडाखा अजूनही सुरूच आहे. त्यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास पावसानं हिरावून घेतला. सध्या पिकं कापणीचा हंगाम असताना अवकाळी पाऊस झाला तर शेतकऱ्यांचे आणखी नुकसान होण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असताना पुन्हा अवकाळी पावसाचं संकट घोंगावत आहेत.

याचा सर्वोचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि दक्षिण भागात आणि पावसाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुंबईस कोकणसह राज्यातील काही भागात पुढील तीन दिवस पावसाची शक्यता असल्याचं मुंबई प्रादेशिक हवामान विभागानं म्हटलं आहे. महाराष्ट्रासह भारतातील दक्षिणेतील भागात सुद्धा पावसाची शक्यता आहे. तसेच मध्य प्रदेश,आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा तसेच ईशान्य भारतातील काही भागातील पावसाची शक्यता असल्याचे हवामान विभागानं म्हटलं आहे.

# मैत्री फाऊंडेशनचा हृदयस्पर्शी दिवाळी उपक्रम – "मैत्री एक रक्तापलीकडचं नातं"

## अनाथ व वृद्धाश्रमात दिवाळीचा आनंद वाटून खऱ्या अर्थाने उजळली दिवाळी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**(ता. निफाड) :** समाजसेवा, मदतीसाठी तत्परता आणि एकमेकांशी भावनिक नातं जपणं ही मैत्री फाऊंडेशन, हनुमाननगर संस्थेची खरी ओळख आहे. 21 मार्च 2021 रोजी या फाऊंडेशनची स्थापना झाली आणि त्यानंतर अल्पावधीतच संस्थेने सामाजिक कार्यात वेगळी ओळख निर्माण केली. "मैत्री एक रक्तापलीकडचं नातं" या बोधवाक्याला साजेसं कार्य करत फाऊंडेशनने अनेक वेळा मदतीसाठी धाव घेतली आहे.

दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने फाऊंडेशनकडून समाजातील वंचित घटकांना सणाचा आनंद मिळावा यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येतो. स्वर्गीय शेखर भाऊ गुंजाळ आणि विवेक भाऊ दरेकर यांच्या स्मरणार्थ सुरू झालेल्या या उपक्रमाला आता सातत्य लाभले आहे. याही वर्षी त्याच परंपरेला अनुसरून फाऊंडेशनच्या सदस्यांनी हनुमाननगर परिसरातील प्रत्येक घरातून प्रेमाने आणि उत्साहाने दिवाळीचे फराळ — लाडू, करंजी, चकल्या, चिवडा, शेव, अनारसे आदी घरगुती पदार्थ — जमा केले.

जमा झालेला हा फराळ अत्यंत आपुलकीने लासलगाव येथील जय जनार्दन अनाथ व वृद्धाश्रमात भेट देण्यात आला. या प्रसंगी कार्यकर्त्यांनी आश्रमातील वृद्ध व्यक्ती आणि लहानग्यांशी संवाद साधला, त्यांच्यासोबत वेळ घालवला आणि सणाचा आनंद वाटला. वृद्धांच्या डोळ्यांत आलेले समाधानाचे अश्रू आणि बालकांच्या चेहऱ्यावर उमटलेलं हसू पाहून सर्व उपस्थितांच्या मनाला स्पर्श करणारा क्षण निर्माण झाला.

> "मैत्री म्हणजे केवळ रक्ताचं नातं नाही, तर संवेदनांचं, माणुसकीचं आणि आपुलकीचं बंधन आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद पोहोचवणं हीच आमची खरी दिवाळी आहे.
> प्रतिक्रिया:- मैत्री फाउंडेशन सदस्य तुषार थेटे

सदर प्रसंगी जय जनार्दन अनाथ आश्रमाचे संचालक श्री. दिलीप गुंजाळ सर यांनी फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक करताना सांगितले की, "आजच्या यांत्रिक जगातही अजून संवेदनशील माणसं आहेत, हेच याचे उदाहरण आहे."

या कार्यक्रमाला तुषार थेटे, किरण भडांगे, मिथुन खलाटे, पवन देवकर, प्रतीक सालगुडे, रोहन दरेकर, सागर गुंजाळ, अमोल ठुबे, योगेश कोल्हे, ऋषिकेश सालगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपक्रमातून समाजात प्रेम, माणुसकी आणि एकतेचा सुंदर संदेश देण्यात आला. मैत्री फाऊंडेशन, हनुमाननगर यांनी गेल्या काही वर्षांत राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे तरुण पिढीत प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून, अनेक संस्थांनी या फाऊंडेशनचा आदर्श घेऊन समाजसेवेत पुढाकार घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

खरंच, मैत्री फाऊंडेशनने यंदाची दिवाळी फक्त फराळाने नव्हे, तर भावनेने आणि माणुसकीने उजळवली आहे.

# अखेर जुना बसस्थानकाने घेतला मोकळा श्वास

## कोकण प्रवासी महासंघाच्या प्रयत्नाला यश

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (वार्ताहर) :**



शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जुन्या एसटी स्टॅन्ड येथील प्रवाशांची होणारी गैरसोय तसेच महामंडळाच्या आवारात फेरीवाले व खाजगी वाहनांची होणारी पार्किंग यामुळे चिपळूण आगारातून येणाऱ्या एस.टी. बसेस जुन्या स्टॅण्डला आत न लावता बाहेर रस्त्यावरच उभ्या कराव्या लागत असे. ही बाब कोकण प्रवासी महासंघाने आगारप्रमुखांच्या निदर्शनात आणून देत सातत्याने पाठपुरावा केल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागीय कार्यालय रत्नागिरी यांनी अतिक्रमण हटाव मोहीम केली. त्यामुळे कोकण प्रवासी महासंघाने धन्यवाद पत्र दिले आहे.या पत्रात असे नमूद केले आहे की, मध्यवर्ती आगार अंतर्गत चिपळूण बाजारपेठेत असलेल्या जुना एस.टी. स्टँड येथे प्रवाशांची गैरसोय होत आहे. महामंडळाचे आणि एसटी अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने अतिक्रमण होत आहे. याबाबत गेली तीन वर्षापासून प्रत्यक्ष भेटीत व पत्राद्वारे संबंधित विभाग व मुंबई मध्यवर्ती कार्यालय यांना प्रवाशांना होणाऱ्या अनेक अडचणीला सामोरे जावे लागत लक्ष वेधले. अखेर कोकण प्रवासी महासंघाच्या प्रयत्नाला यश आले. महामंडळ खडबडून जागे होऊन अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली. तसेच परत अतिक्रमण होऊ नये याकरिता एसटी वाहतूक अधिकारी येथे जातीने पहारा देत आहेत. महामंडळ याने केलेल्या कार्यवाहीबद्दल लाखो प्रवाशांच्या वतीने अभिनंदन करत धन्यवाद देण्यात आले.तसेच आवारात असलेली सदर इमारतीची अवस्था दयनीय आहे. प्रवाशाना बसण्यास योग्य जागा नाही. प्रवासी इमारतीत न बसता शेजारी असलेल्या स्टॉलच्या पायरीवर बसत आहे. घाणीचे साम्राज्य असून इमारतीची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. याकडेसुद्धा जातिनिशी लक्ष देण्यात यावे असेही या निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनावर संस्थापक वसंत भोसले, अध्यक्ष गणेश चव्हाण, उपाध्यक्ष दीपक शीरकर, कार्याध्यक्ष अनिलकुमार जोशी, खजिनदार अविनाश चव्हाण, चिपळूण संपर्कप्रमुख दिलीप चव्हाण, गुहागर संपर्क दत्ताराम जाधव, सल्लागार मनोहर साळवी, सत्यवान महापुस्कर यांनी स्वाक्षरी केली आहे.

# 'झिरो' ते 'हिरो'... नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या धडाक्याने बदल

**दैनिक युवक आधार**






कुंभनगरी नाशिकमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी नाशिक शहर पोलिसांनी कंबर कसली आहे. राजकीय पुढाऱ्यांच्या वरदहस्ताने फोफावलेली गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी पोलिसांकडून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांना नाशिकच्या नागरिकांकडून पुरेपूर पाठिंबा मिळत आहे.

गुंडांना चोप देण्यात येत असल्याने सर्वसामान्य पोलिसांनाही नाशिकमध्ये सन्मान मिळू लागला आहे.

दिवाळीत नाशिक शहरात काढण्यात आलेल्या रेड्यांच्या मिरवणुकीत बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलिसांवर नागरिकांकडून पुष्पवर्षाव करण्यात आला. अवघ्या महिन्याभरात ही जादू झाली आहे.

जे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक आज नाशिककरांसाठी हिरो झाले आहेत, तेच महिन्यापूर्वीपर्यंत नाशिककरांच्या दृष्टीने झिरो होते.

नोव्हेंबर २०२३ मध्ये पोलीस आयुक्त म्हणून नाशिकचा कारभार हाती घेतल्यानंतर कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळण्यासाठी संदीप कर्णिक यांनी आपल्या पध्दतीने प्रयत्न सुरु केले. सीपी व्हॉटसअप हेल्पलाइन नंबर जाहीर करुन सर्वसामान्यांना मदत मागता येईल, असे आवाहन केले.

शहरातील गुन्हेगारी कशी रोखता येईल, हे जाणून घेण्यासाठी नागरिकांकडून काही सूचना असतील तर त्यासाठी पोलीस आयुक्त आपल्या दारी हा उपक्रमही राबविला.गुन्ह्यांमधील विधिसंघर्षित बालकांचा वाढता सहभाग लक्षात घेत त्यांचे समूपदेशन करण्याचीही भूमिका घेतली.

परंतु, या सर्व उपाययोजनांचा फारसा उपयोग होत नसल्याचे गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येवरुन दिसून आले. जानेवारीपासून सप्टेंबरपर्यंत या वर्षी ४२ हत्यांची नोंद नाशिकमध्ये झाली होती. लुटमार, हाणामारी, वाहनांची तोडफोड, खंडणी, अपहरण हे प्रकार तर नेहमीचे झाले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये पोलीस आयुक्तांविषयी रोष वाढू लागला.

पोलिसांनी कठोर भूमिका घेण्याची मागणी सातत्याने होऊ लागली. त्यासाठी तत्कालीन आयुक्त विष्णुदेव मिश्रा, कुलवंतकुमार सरंगल, दीपक पांडे यांनी केलेल्या कारवाईचे उदाहरण देण्यात येऊ लागले.आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, नाशिकमधील वाढती गुन्हेगारी सत्ताधारी महायुतीसाठी त्रासदायक ठरण्याची चिन्हे दिसू लागल्याने शहरातील भाजपच्या तीनही आमदारांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कैफियत मांडली.

त्याआधी मनसे-शिवसेना (उध्दव ठाकरे) यांनी वाढत्या गुन्हेगारीविरोधात संयुक्त मोर्चा काढला. महायुतीतील शिवसेनेचे (एकनाथ शिंदे ) मंत्री दादा भुसे यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेऊन गुन्हेगारी आटोक्यात आणण्याची सूचना केली. अखेर सर्वबाजूने टीका होऊ लागल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना गुन्हेगारी मिटविण्यासाठी पूर्णपणे मोकळीक दिली असल्याचे नाशिकमधील एका कार्यक्रमानिमित्त आले असता जाहीर केले. त्यानंतर मात्र पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी भूमिका बदलली.

एखाद्या हिंदी चित्रपटाप्रमाणे इंटरव्हलनंतर पूर्णपणे परिस्थिती पालटली.

पोलिसांनी धडाधड राजकीय गुन्हेगारांविरुध्द कारवाईला सुरुवात केली. त्यात मग रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक प्रकाश लोंढे, त्याचा मुलगा दीपक लोंढे, भाजपमध्ये काही महिन्यांपूर्वी प्रवेश केलेला मामा राजवाडे, भाजपचा माजी नगरसेवक जगदीश पाटील, भाजपचे पदाधिकारी सुनील बागूल यांचा पुतण्या अजय बागूल यांच्यासह इतर अनेकांना पोलिसी हिसका बसला.